• पंढरपूर • शनिवार, २३ नोव्हेंबर २०२४
• किंमत ₹ ४ • पाने : ८


# पंढरी संचार

NO PAIDNEWS NEWSPAPER

pandharisanchar.com
RNI-MAH-MAR/1499/2000
• वर्ष २९ • अंक - १८३




चुकीच्या अफवा पसरणाऱ्यावर कारवाई करणार PII



योगामुळे कार्यक्षमता वाढते -आर्ट ऑफ लिव्हिंगच्या साध्वी तत्वमयी PIII

# सत्ता स्थापनेसाठी महायुती, आघाडी मैदानात!

## शिंदे, फडणवीस, ठाकरे, पवार, पटोले रणनीतीत व्यस्त

## वाढलेल्या टक्क्यावर विजयाची गणितं

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**मुंबई :** पुढील पाच वर्षासाठी महाराष्ट्राच्या सत्तेच्या चाव्या कुणाच्या हातात राहणार याचा फैसला उद्या दुपारी पाच वाजेपर्यंत निवडणूकीचा कल हाती येताच याची स्पष्ट कल्पना जनतेला येऊ शकते. या निवडणुकीसाठी महायुती, मविआ आणि अपक्ष यांच्यात तुलनात्मक दृष्ट्या अटीतटीची निवडणूक झाल्याचे चित्र महाराष्ट्रात दिसून येत असून कोणत्याही परिस्थितीत सत्तेचा दावा आम्हीच उद्या करणार असे खडे बोल तिन्हीही पक्षाचे नेते करत असताना दिसत असतानाच आज उबाठा गटाचे नेते उद्धव ठाकरे, शिवसेना शिंदे गट चे प्रमुख एकनाथ शिंदे, काँग्रेसचे नाना पटोले, भाजपचे देवेंद्र फडणवीस आणि चंद्रशेखर बावनकुळे यांनी आपल्या उमेदवाराशी उद्याच्या मतदान प्रक्रियेवर कशा पद्धतीने बारीक लक्ष ठेवले गेले पाहिजे याचे मार्गदर्शन या सर्वच पक्षाच्या नेत्यांनी आपल्या पक्षाच्या उमेदवारांना करुन दक्षता घेण्याचे आव्हान केले आहे.

आज शरद पवार यांनी मअविला १५७ जागा मिळतील असा विश्वास व्यक्त करुन व्हीसी यंत्रणेव्दारे सर्व उमेदवारांशी त्यांनी संपर्क केला. आणि याचवेळी उद्या दक्षता कशी घ्यायची याबाबतही त्यांनी मार्गदर्शन केले.

आज सकाळी पत्रकारांशी बोलताना उबाठा गटाचे नेते खा. संजय राऊत यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे शरद पवार गट प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांचे ड्रायव्हींग अतिशय उत्तम असून ते योग्य प्रकारे सरकार चालवतील असे विधान खा. संजय राऊत यांनी केल्याने राजकीय वातावरणात तप्तता वाढताना दिसत आहे.

याच दरम्यान महायुतीचे सर्वव आमदार एकत्र ठेवण्यासाठी महायुतीच्या नेत्यांनी त्यांच्या मुंबईत निवास व्यवस्थेबाबत दक्षता घेतली असून तीन मुख्य हॉटेलमध्ये या आमदारांच्या निवासाची व्यवस्था करण्यात आली असल्याचे सांगण्यात येते. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सायंकाळच्या सुमारास आपल्या पक्षाच्या प्रवक्त्यांची बैठक वर्षा निवासस्थानी बोलाविली असून याच वेळी पुढची रणनीती काय असावी याची ही चर्चा केली असल्याचे विश्वसनीय सूत्र हाती आले आहे.

लोकसभेच्या निवडणूकीत शिवसेना शिंदे गट यांचा स्ट्राईक रेट सर्व पक्षापेक्षा जास्त असल्याने शिवसेनेच्या अंतर्गत मुख्यमंत्री पदावर शिंदे यांचा हक्क आहे याबाबतची चर्चा वरिष्ठ पातळीवर होताना दिसते. सर्वात आश्चर्य म्हणजे ओबीसी मतदारांचा कल भाजपाकडे अधिक झुकला असल्याची माहिती भाजपच्या वरिष्ठ नेत्यांकडून सांगण्यात येत असतानाच जरांगे फॅक्टरचा प्रयोग भाजपाला जरांगेना अपेक्षित होता. त्यापद्धतीने झाला नसल्याचे नेत्यामध्ये चर्चिले जात असल्याचे दिसत आहे. भाजपच्या अंतर्गत संघाच्या स्वयंसेवकांनी मतदाराचे जार्गृतीचे गाव पातळीपर्यंत संपर्क साधून काम केल्याने अनेक ठिकाणी लोकसभेपेक्षा या निवडणूकीत मतदारांनाची टक्केवारी वाढताना दिसत आहे. सद्या तिन्हीही आघाड्याकडून सत्तेचा अंदाज व्यक्त केला असला तरी तिन्हीही आघाड्यांचे लक्ष अपक्ष निवडून आलेल्या आमदारांकडेच असल्याने तिन्हीही आघाड्याकडून सत्तेच्या खुर्चीचे अमिष दाखविण्यात या नेत्यांनी » पान ३ वर

## » At a Glance

### हजर न राहिल्याने शिक्षकावर गुन्हा



**बार्शी :** विधानसभा निवडणुकीत कर्तव्याच्या ठिकाणी हजर न राहता शासकीय आदेशाचे उल्लंघन केल्याप्रकरणी बार्शीतील सुलाखे हायस्कूलचे सहशिक्षक यांच्या विरुद्ध सांगोला पोलिस स्टेशनला गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत सोमनाथ सदाशिव साळुंखे (रा. कुंभार गल्ली, सांगोला) यांनी फिर्याद दिली आहे. पोलिसांनी वैभव भास्कर कदम (रा. बेलेश्वर नाका, सुलाखे हायस्कूल, बार्शी, जि. सोलापूर) यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ कलम २२३ प्रमाणे सहलोकप्रतिनिधित्व कायदा १९५१ चे कलम १३४ प्रमाणे दखलपात्र गुन्हा केला आहे.

### अपक्ष उमेदवारांचे मार्केट वाढले



**सोलापूर :** महाविकास आघाडी आणि महायुतीच्या नेत्यांनी हालचालींना सुरुवात केली आहे. महायुती आणि महाविकास आघाडीच्या नेत्यांनी अपक्ष उमेदवारांना गळाला लावण्याचे प्रयत्न सुरु केले आहे. ज्या मतदारसंघात अपक्ष उमेदवार विजयी होण्याची शक्यता आहे, त्या ठिकाणच्या उमेदवारांना महाविकास आघाडी आणि महायुतीच्या नेत्यांनी फोन केल्याची माहिती मिळत आहे. दरम्यान, सोलापूर जिल्ह्यातील माढा, करमाळा आणि सांगोला मतदारसंघातील अपक्ष उमेदवारांना दोन्ही बाजूकडून निरोप यायला सुरुवात झाल्याची माहिती मिळत आहे.

### भरारी व स्थायी देखरेख पथकाची कार्यवाही सुरू राहणार

**सोलापूर :** सार्वत्रिक विधानसभा निवडणूक 2024 अनुषंगाने भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार व मार्गदर्शक सुचनेनसार मतदानाची प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत भरारी पथक व देखरेख पथकाकडून कार्यवाही सुरू ठेवण्यात यावी, असे आचार संहिता कक्ष प्रमुख सार्वत्रिक निवडणूक 2024 तथा अपर जिल्हादंडाधिकारी सोलापूर मनिषा कुंभार यांनी आदेश दिले आहेत.

## लाडक्या बहिणींची मते निर्णायक ठरणार


■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदार संघात एक लाख 24 हजार 497 लाडक्या बहिणीने मतदान केले आहे. यामुळे ही मते निवडणुकीत निर्णायक ठरणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे. या मताचा फायदा कोणाला होणार याकडे लक्ष लागले आहे.

पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदार संघात 2 लाख 59 हजार 774 जणांनी मतदानाचा हक्क बजावला. मतदान 70 टक्के झाले. यात महिला मतदार 1 लाख 24 हजार 497 तर पुरुष मतदार, 1 लाख 35 हजार 238 जणांनी मतदानाचा हक्क बजावला आहे. लोकसभा निवडणुकीत महायुतीला म्हणावे तसे यश मिळाले नसल्याने विधानसभा निवडणूक डोळ्यासमोर ठेवून महिलांची मते मिळविण्यासाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना जाहीर केली आहे. या योजनेअंतर्गत महिलांना महिना 1500 रुपये देण्यात येत आहेत. याचा लाभ राज्यातील कोट्यावधी



महिलांना मिळाला आहे. महिलांना फायदा मिळाला असल्याने महिला मतदानासाठी घराबाहेर पडल्या आहेत. यामुळे पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदार संघात 1 लाख 24 हजार 497 महिलांनी मतदानाचा हक्क बजावला आहे. पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदार संघात महायुती भाजपकडून आमदार समाधान आवताडे, महाविकास आघाडी काँग्रेसकडून भगीरथ भालके, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाकडून अनिल सावंत तर मनसे कडून दिलीप धोत्रे यांनी निवडणूक लढविली आहे. ही निवडणूक चौरंगी झाली असून यात चुरशीचे मतदान झाले आहे. यामुळे कोण विजयी होईल. याबाबत उत्सुकता लागली आहे. मतमोजणी आज शनिवारी सकाळी आठ वाजता शासकीय गोदाम येथे होणार आहे. दुपारी तीन वाजेपर्यंत संपूर्ण निकाल हाती येण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.



## वातावरण बदलाचा शेतीला फटका

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** ढगाळ वातावरण निर्माण झालेले आहे. हवामान विभागाच्या संकेत स्थळावरील अनुमानानुसार शुक्रवार आणि शनिवारी जिल्ह्यात तुरळक ठिकाणी पाऊस होण्याची शक्यता आहे. हा पाऊस सर्व भागात नसला तरी ढगाळ वातावरण मात्र सर्वत्र राहणार आहे. डाळिंब व द्राक्ष बागांसाठी ढगाळ वातावरण हे अत्यंत घातक आहे. जिल्ह्यात सध्या एक लाख हेक्टर तूर पीक आहे. हे पीक सध्या फुलोऱ्यात असून घाटेआळीचा प्रादूर्भाव मोठ्या प्रमाणात होण्याची शक्यता आहे.

## दहावी परीक्षा २१ तर बारावीची परीक्षा ११ फेब्रुवारीपासून सुरू

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**पंढरपूर :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने इयत्ता दहावीची परीक्षा 21 फेब्रुवारी तर बारावीची परीक्षा 11 फेब्रुवारीपासून घेण्यात येणार आहे. इयत्ता दहावी व इयत्ता बारावीची परीक्षा विद्यार्थ्यांच्या जीवनात टर्निंग पॉईंट ठरते. यामुळे या परीक्षेला खूप महत्त्व प्राप्त झाले आहे. विद्यार्थी वर्षभर चांगल्या पद्धतीने अभ्यास करून जास्त गुण वाढवून नामवंत महाविद्यालयात प्रवेश मिळवण्यासाठी प्रयत्न करतात. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळा वतीने इयत्ता दहावीची परीक्षा 21 फेब्रुवारी ते 17 मार्च तर इयत्ता बारावीची परीक्षा ११ फेब्रुवारी ते 18 मार्च 2025 या कालावधीमध्ये घेण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांनी चांगल्या पद्धतीने अभ्यास करावा. यासाठी परीक्षेचे वेळापत्रक अगोदरच जाहीर केले जाते. त्याप्रमाणे यंदाच्या वर्षी महामंडळाने वेळापत्रक प्रसिद्ध केले आहे.

## गुलाल, हार, फटाके दुकाने सज्ज

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदार संघासाठी बुधवारी मतदान झाले आहे. आज शनिवारी सकाळी आठ वाजल्यापासून शासकीय गोदाम येथे मतमोजणी करण्यात येणार आहे. उमेदवार विजयी झाल्यानंतर पदाधिकारी कार्यकर्त्यांकडून आनंद व्यक्त केला जातो. यासाठी गुलालाची उधळण फटाक्याची अतिशय बाजी व विजयी उमेदवारास फुलांचे हार घातले जातात. यासाठी गुलाल, फटाके, हार यास मागणी असल्याने पंढरपूर शहरात विविध ठिकाणी या वस्तू विक्री करण्याची दुकाने सज्ज झाली आहेत. पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदार संघात चौरंगी लढत झाली आहे. यात चुरशीचे 70 टक्के मतदान झाले असून दोन लाख 59 हजार 744 मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला आहे. शासनाने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरू केल्यामुळे या निवडणुकीत मतदान करण्यासाठी महिला मोठ्या प्रमाणावर बाहेर पडल्या असल्याचे दिसून आले आहे. या मतदार संघात भाजपचे आमदार समाधान आवताडे, काँग्रेसचे भगीरथ भालके, राष्ट्रवादी काँग्रेसचे अनिल सावंत व मनसेचे दिलीप धोत्रे यांनी निवडणूक सहभाग घेतला आहे. गेल्या पंधरा दिवसापासून या चारही उमेदवारांनी वाड्यावस्तीवर जाऊन जोमाने प्रचार केला आहे. आपले काम मतदारापर्यंत पोहोचविले आहे. यामुळे मतदार राजा कोणाला विजयी करणार याकडे लक्ष लागले आहे. आज शनिवारी सकाळी आठ वाजता शासकीय गोदाम येथे मतमोजणी करण्यात येणार आहे. यासाठी प्रशासनाने यंत्रणा सज्ज ठेवली आहे. उमेदवार विजयी झाल्यानंतर पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्याकडून गुलालाची उधळण फटाक्याची आतिषबाजी व विजयी उमेदवारास हार घातले जातात. यासाठी या वस्तूंना मोठ्या प्रमाणात मागणी येते. म्हणून पंढरपूर शहरात विविध ठिकाणी या वस्तू विक्रीची दुकाने सज्ज झाली आहेत. कोण विजयी होणार याकडे पंढरपूर तालुक्याचे लक्ष लागले आहे.



## शेतीच्या बांधावरुन ६० वर्षीय व्यक्तीचा खून!

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क




**अक्कलकोट :** शेतीचा बांध टोकरण्यावरुन झालेल्या मागील भांडणाच्या रागातून व नेहमीच्याच किरकिरीमुळे किरनळ्ळीच्या (ता. अक्कलकोट) शिवारातील शेताच्या शेजारील सुरेश सिद्धाराम कोतले, सिद्धाराम सुरेश कोतले, संगिता सिद्धाराम कोतले (तिघेही रा. घोळसगाव, ता. अक्कलकोट) यांनी शशिकांत पांडुरंग कोळेकर (वय ६०, रा. किरनळ्ळ) यांचा कुऱ्हाडीचा घाव घालून खून केला. या प्रकरणी तिघांविरुद्ध अक्कलकोट उत्तर पोलिसांत गुन्हा दाखल झाला असून त्यातील सिद्धाराम कोतले व संगिता कोतले यांना न्यायालयाने सोमवारपर्यंत (ता. २५) पोलिस कोठडी ठोठावली आहे.

## पंढरपूर-मंगळवेढा मतदार संघात कोण बाजी मारणार ?

# पंढरपुरात निकालाची उत्सुकता शिगेला; आज मतमोजणी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघात चौरंगी लढत झाली आहे. यामुळे कोण विजयी होणार याबाबत नागरिकात उत्सुकता लागली आहे. आज शनिवारी सकाळी आठ वाजल्यापासून शासकीय गोदाम येथे मतमोजणी करण्यास सुरुवात करण्यात येणार आहे. निकालाकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे . पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदार संघ हा राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जातो. यामुळे या मतदार संघात खासदार शरद पवार कोणाला उमेदवारी देणार याकडे लक्ष लागले होते. या मतदारसंघातून उमेदवारी मिळावी म्हणून भगीरथ भालके अनिल सावंत, वसंतनाना देशमुख, नागेश भोसले यांनी शरद पवार यांची भेट घेऊन उमेदवारीची मागणी केली होती. उमेदवारी मिळो अथवा न मिळो जनता हाच आपला पक्ष म्हणून निवडणूक लढविण्याची तयारी भगीरथ भालके यांनी सुरू केली होती. राष्ट्रवादी काँग्रेस कडून उमेदवारी मिळण्यास विलंब होत असल्याने भगीरथ भालके यांनी काँग्रेसच्या नेत्यांबरोबर चर्चा करून उमेदवारी घेतली.

यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाने अनिल सावंत यांना उमेदवारी दिली. यामुळे या मतदारसंघात आघाडीत बिघाडी झाली. महाविकास आघाडीचे दोन उमेदवार निवडणूक रिंगणात उभे राहिले. या मतदार संघात महायुतीने आमदार समाधान आवताडे यांना उमेदवारी दिली. गेल्या काही वर्षापासून आमदार अवताडे व माजी आमदार प्रशांत परिचारक यांच्यात मतभेद निर्माण झाले होते. मात्र भाजपच्या वरिष्ठ नेत्यांनी यात लक्ष घालून दोघांमधील मतभेद मिटविले आहेत. यामुळे परिचारक यांनी प्रचारात सहभाग घेतला असल्याचे दिसून आले आहे. तर मनसेने दिलीप धोत्रे यांना उमेदवारी दिली आहे. धोत्रे यांनी दहा वर्षापासून दोन्ही तालुक्यात विविध विकासाची कामे केली आहेत. गोरगरिबांना मदत केली आहे. यामुळे मनसेची ताकद वाढली असल्याचे दिसून आले आहे. धोत्रे यांनी आपण केलेले काम मतदारापर्यंत पोहोचवून मतदान करून आशीर्वाद द्यावा असे आवाहन केले होते. पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघासाठी बुधवारी मतदान घेण्यात आले. यात चौरंगी लढत झाली 70 टक्के मतदान झाले. २ लाख 59 हजार 744 जणांनी मतदानाचा अधिकार बजावला. मतमोजणी आज शनिवारी शासकीय गोदाम येथे करण्यात येणार आहे. यासाठी प्रशासनाने यंत्रणा कामाला लावली आहे. 14 टेबल मतमोजणीसाठी ठेवण्यात आली असून 25 फेऱ्या होणार आहेत. या निवडणुकीत कोण विजयी होणार याबाबत प्रचंड उत्सुकता मतदारांमध्ये असल्याचे दिसून येत आहे.

पंढरी संचार


आपल्या जवळच्या चित्रपटगृहात




CityPride — सिटिप्राईड : मंगला ७.३० ; सिटीप्राईड सातारा रोड रा. ८.०० ; कोथरुड २.००, १०.०० ; आर डेक्कन ७.१५ ; रॉयल पिंपळे सौदागर रा. १०.००

Cinépolis — सिझन मॉल ४.३०, ९.००, १०.०० ; वेस्ट एन्ड औंध १.३०, ८.१५ ;

PVR INOX — पिव्हीआर/आयनॉक्स सिनेमाज : मार्केटसिटी पुणे २.२०, ८.३५, १०.४५ ; पॅव्हेलियन १२.१५, ५.४५ ; ग्रँड हायस्ट्रीट हिंजवडी २.००, ८.०५ ; डीसी कोपा १२.००, ५.१० ; कुमार पॅसिपीक पुणे १.३०, ७.५० ; बंड गार्डन पुणे ३.४५, १०.१५ ; जयगणेश पिंपरी ९.३०, ३.५०, १०.१० ; रॉयल हेरीटेज मॉल पुणे ९.३५, ३.४५, १०.३० ; पीएमसी वाकड १.२०, ४.२०, ७.४०, १०.४०, एल्प्रो चिंचवड १२.४०, ७.०० ;

Abhiruchi CityPride — अभिरुची सिटीप्राईड सिंहगड रोड २.१५, १०.००
फनटाईम सिंहगड रोड १२.३०, ३.००, १०.३०
फनटाईम पिंपरी १२.३०, ३.००, १०.३०
राहुल पुणे १.००, १०.३०

E - SQUARE ENTERTAINMENT ETC — बॉलीवुड खराडी रा. ८.४५, इलाईट झॉन हिंजवडी ४.००
वैभव हडपसर १.१५, ९.४५
राजहंस फातिमानगर १२.००,७.००
अशोक पिंपरी ३.३०

विशाल पिंपरी १.३०, १०.३०
फनक्रेअर गोतावडे फाटा ७.००
तारा बारामती १.००, ९.;३०
MIRAJ — स्पाईन मॉल भोसरी १२.४५, १०.००

MOVIE MAX — अमानोरा ४.३०, ८.४५ ; मारीप्लेक्स ४.००
विलक्स खडकी ६.३०
वसंत सिनेप्रो १२.३०, १०.००
राहुल इंदापूर १२.००

सुभद्रा बारामती ३.१५, ९.००
शिवाजी तळेगाव
स्वामी समर्थ जेजुरी १२.००, ९.००
नवनाथ वणेवाडी १२.००, ९.००
डिजी गोल्डनोवा शिरुर ६.३०

शेवंता जुन्नर ३.००, ६.०० ; आशिष निरा १२.००, ६.०० ; सत्यम राजगुरुनगर ३.००, ६.०० ; गुंजन शिखरापूर १.००, ७.०० ; गुंजन कारेगाव ३.००, ६.०० ; गुंजन न्हावरे ३.००, ९.०० ; लक्ष्मी नारायणगाव ३.०० ; सिनेब्लिज नीलकमळ लोणावळा ३.३०

**सोलापूर :** 248-सोलापूर शहर उत्तर विधानसभा मतदारसंघातील मतमोजणीचे ठिकाण सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालय, केगांव, सोलापूर -पुणे राष्ट्रीय महामार्ग सोलापूर येथे होणार असल्याची माहिती जिल्हा प्रशासनाकडून घेण्यात आली. सोलापूर शहर उत्तर विधानसभा मतदारसंघात 56. 62% मतदान झाले आहे. हा मतदारसंघ सध्या भारतीय जनता पार्टीच्या ताब्यात असून या निवडणुकीत ते आपला गड राखणार का अशी चर्चा आहे.

## मोहोळ मतदार संघातील मतमोजणीसाठी यंत्रणा सज्ज

# मत मोजणी एकूण २४ फेऱ्या होणार - मुळीक

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मोहोळ :** उद्या होणाऱ्या मतमोजणीसाठी एकूण २४ फेऱ्यांमध्ये मतमोजणी होणार असून पुरेशा संख्येने कर्मचारी वर्ग तैनात करण्यात आल्याची माहिती सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसिलदार सचिन मुळीक यांनी दिली.

ही मतमोजणी टेलीफोन कार्यालयाजवळ असलेल्या धान्य गोडाऊन मध्ये होईल. यासाठी तयारीची माहिती ते म्हणाले "सकाळी आठ वाजता मतमोजणीला सुरुवात होईल. पहिल्यांदा टपाली मतदान मोजले जाईल . या मतमोजणीसाठी १४ टेबलची व्यवस्था केली असून याद्वारे २४ फेऱ्या होणार आहेत. तर पोस्टल मतमोजणीसाठी ७ टेबल, आणि इ. टी. पी. बी. एस. (इलेक्ट्रॉनिकली ट्रान्समिटेड पोस्टल बॅलेट सिस्टीम ) साठी २ टेबलद्वारे मोजणी केली जाणार आहे. मतमोजणी प्रक्रियेत एका टेबलला ३ कर्मचारी व १ अधिकारी असे एकूण ५६ कर्मचारी तर पोस्टलसाठी ३० कर्मचारी, अधिकारी इ. टी. पी. बी. एस. साठी ८ कर्मचारी, ईव्हीएम मशीनची ने-आण करण्यासाठी ५० कर्मचारी सिलिंग करण्यासाठी ३० कर्मचाऱ्यांची नेमणूक केली आहे. तसेच या सर्व यंत्रणेला राखीव ११० टक्के कर्मचारी ठेवले आहेत.



मतमोजणी शांततेत पार पाडण्यासाठी १३ पोलिस अधिकारी १०० पोलिस कर्मचारी, एक दंगा काबू पथक, तसेच शहर परिसरात पेट्रोलिंग करण्यासाठी एक पथक, मतमोजणी परिसरात कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे.

ही निवडणुक शांततेत पार पाडण्या साठी निवडणुक निर्णय अधिकारी सीमा होळकर सहाय्यक निवडणुक निर्णय अधिकारी सचिन मुळीक नायब तहसीलदार सुधाकर धाईजे, नायब तहसीलदार अनिल शहापूरे, मंडल अधिकारी प्रकाश दळवी, मंडळ अधिकारी जे. एफ. नदाफ, निवडणूक महसूल सहाय्यक अजित वाघमोडे प्रयत्नशिल आहेत . तसेच शुक्रवार दि . २२ रोजी मतमोजणी निवडणूक निरीक्षक दर्शनाबीन भागलानी यांनी मतमोजणी कर्मचारी यांना मार्गदर्शन केले. मतमोजणी केंद्रापासून १०० मीटर परिसरात (Pedestrain Zone) पादचारी मार्ग तालुका कार्यकारी दंडाधिकारी यांनी घोषित केला आहे

**अफवा पसरविल्यासकारवाई करणार-**

नागरिकांनी चुकीच्या अफवा पसरवू नये व कोणत्याही खोट्या अफवांना बळी पडू नये, निवडणूक आयोगाची प्रतिमा मालिन होऊन लोकशाही व लोकांच्या मनात संभ्रम निर्माण होण्याची शक्यता असते असे आढळल्यास कठोर कारवाई केली जाईल. पारदर्शक मतमोजणीची प्रशासनाकडून प्रक्रिया सुरू आहे, ईव्हीएम मशिन हे कोणत्याही नेटवर्कला कनेक्ट होत नाही, चुकीची माहिती व्हायरल करू नयेत असे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी सीमा होळकर यांनी केले. या मतदारसंघांमध्ये २ लाख ३० हजार ८४४ जणांनी मतदान केले. त्यात १२३६८९ पुरुष आणि १०७१५५ स्त्री मतदार आहेत. साधारणपणे ६९.६५% एवढी टक्केवारी होते. महायुतीचे विद्यमान आमदार यशवंत माने यांच्याविरुद्ध महाविकास आघाडीचे राजाभाऊ खरे अशी प्रामुख्याने लढत झाली भाजपातून राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटात प्रवेश करून तिथले तिकीट न मिळालेले लोकसेवक संजय क्षीरसागर यांनी बंडखोरी करून फॉर्म ठेवला होता. मात्र अखेरच्या दिवशी त्यांनी खरे यांना पाठिंबा दिला खरा पण त्यांचे नाव मतपत्रिकेमध्ये आलेलेच आहे. या तीन जणाशिवाय १० जणाशिवाय आणि नोटामध्ये सामना झाला. आता घड्याळाची टिकटिक चालणार की तुतारी वाजणार याकडे मतदार संघाचे लक्ष लागून राहिले आहे.

## चुकीच्या अफवा पसरणाऱ्यावर कारवाई करणार



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** मतमोजणी प्रक्रियेदरम्यान कोणत्याही प्रकारच्या अफवा पसरवू नयेत, असे स्पष्ट करताना कुकडे यांनी सांगितले की, नागरिकांनी सोशल मीडियाचा जबाबदारीने वापर करावा. अफवा अथवा चुकीची माहिती पसरवल्यास संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, पोलिस निरीक्षक बालाजी कुकडे त्यांनी बजावले. कोणीही अफवा अथवा चुकीची माहिती पसरवू नये असे आवाहन करण्यात आले आहे.

Selected

## शिंदेंच्या प्रतिमेला जोडे मारल्याने माजी आमदारावर गुन्हा दाखल



**सोलापूर :** सोलापूरमध्ये खासदार प्रणिती शिंदे यांच्या प्रतिमेला जोडेमारो आंदोलन केल्याप्रकरणी माजी आमदार उत्तम प्रकाश खंदारे आणि शिवसेना (उबाठा) उपनेते शरद कोळी यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. काँग्रेसने अपक्ष उमेदवाराला पाठिंबा दिल्याने महाविकास आघाडी धर्म पाळला नसल्याचा आरोप शिवसैनिकांनी केला. मतदानानंतर उबाठा कार्यालयाजवळ शिंदे यांच्या फोटोला जोडेमार करत घोषणाबाजी करण्यात आली. पोलिसांनी जमावबंदी आदेशाचे उल्लंघन केल्याने कारवाई केली आहे. या घटनेमुळे निवडणुकीनंतरही तणाव कायम आहे.

## बांगड्या, चपला फेकल्या ; पुतळा जाळण्याचा प्रयत्न



**सोलापूर :** शिवसेनेचे प्रवक्ते शरद कोळी यांनी एका आंदोलनादरम्यान सुशीलकुमार शिंदे, खासदार प्रणिती शिंदे यांच्याबद्दल एकेरी आणि अपशब्द वापरून गाळ देण्याची भाषा केली. यामुळे महिला काँग्रेस व जागृती विचार मंचच्या महिला कार्यकर्त्या आक्रमक झाल्या होत्या. त्यांनी शरद कोळी यांचा निषेध करण्यासाठी पत्रकार भवन चौकातील त्यांच्या ऑफिसवर चाल करून जात चपला व बांगड्या फेकल्या आणि पुतळा जाळण्याचा प्रयत्न केला. यावेळी पोलिसांनी विरोध करत पुतळा हिसकावून घेतला. तसेच शरद कोळी यांच्या निषेधाची जोरजोरात घोषणाबाजी करण्यात आली.

## मतमोजणीवेळी ओळखपत्र असलेल्यांशिवाय अन्य कोणालाही प्रवेश नसणार - सोलापूर पोलिस आयुक्त

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** विधानसभेची मतमोजणी शनिवारी सकाळी आठपासून सुरू होणार आहे. या पार्श्वभूमीवर शहरातील सोलापूर शहर उत्तर, सोलापूर शहर मध्य व दक्षिण सोलापूर या तिन्ही मतदारसंघाची मतमोजणी अनुक्रमे सिंहगड अभियांत्रिकी कॉलेज, नूतन मराठी विद्यालय व एसआरपी कॅम्पमधील बहुद्देशीय सभागृहात पार पडणार आहे. मतमोजणीवेळी ओळखपत्र असलेल्यांशिवाय अन्य कोणालाही १०० मीटर अंतरात प्रवेश नसणार आहे. पोलिस आयुक्त एम. राज कुमार यांनी त्यासंबंधीचे आदेश काढले आहेत. विधानसभा निवडणुकीनंतर आता मतमोजणी होणार असून मतमोजणी पूर्ण होईपर्यंत तेथील १०० मीटर अंतरात अन्य कोणत्याही व्यक्तीला मोबाईल, टॅब्लेट, संगणक व संदेशाची देवाणघेवाण करणारी विद्युत उपकरणे, तंबाखूजन्य पदार्थ, आगपेटी, लायटर व ज्वालाग्राही पदार्थ घेऊन जाण्यावर निर्बंध असणार आहेत.



कर्मचारी, उमेदवार, उमेदवारांचे मतमोजणी प्रतिनिधी, निवडणूक कार्यालयाकडून ओळखपत्र दिलेल्या व्यक्तींशिवाय अन्य कोणालाही त्याठिकाणी प्रवेश दिला जाणार नाही, असेही पोलिस आयुक्तांच्या आदेशात नमूद आहे. कोणीही कोणत्याही प्रकारचे शस्त्र घेऊन येवू नये, परवानगी नसलेल्या वाहनांनाही त्या परिसरात बंदी असणार आहे. हा आदेश शनिवारी सकाळी पाच ते मतमोजणी पूर्ण होईपर्यंत लागू असणार आहे. दुसरीकडे ग्रामीण भागातील म्हणजेच तालुक्याच्या ठिकाणी होणाऱ्या मतमोजणीच्या केंद्रापासून २०० मीटर अंतरापर्यंत शहराप्रमाणेच निर्बंध लागू असणार आहेत.

## संतोष पाटील यांचा काँग्रेसला सज्जड दम



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** युवक काँग्रेस अध्यक्ष कडून शरद कोळींची गाडी फोडण्याचा इशारा दिल्यानंतर ठाकरे गटाचे शिवसैनिक आक्रमक, शरद कोळी यांची गाडी फोडल्यास खासदार प्रणिती शिंदे आणि सुशील कुमार शिंदे यांचे घर फोडू असा इशारा दिला आहे. शिवसेना ठाकरे गटाचे उपजिल्हाप्रमुख संतोष पाटील यांचा काँग्रेसला सज्जड दम, काँग्रेसच्या महिला पदाधिकाऱ्यांनी शरद कोळींच्या कार्यालयाबाहेर बांगड्या आणि चप्पल दाखवत आंदोलन केल्यानंतर शिवसैनिक आक्रमक झाले.


## शिराळमध्ये बिबट्यासदृश प्राणी



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**माढा :** माढा तालुक्यातील शिराळ (मा) येथील वस्तीवर राहणाऱ्या शेतकरी सतीश टोणपे यांच्या घरासमोरील अंगणात बांधलेल्या दोन शेळ्यांसह एका लहान पिलावर बिबट्या सदृश प्राण्याने हल्ला करून ठार मारले. ही घटना गुरुवार, २१ नोव्हेंबर रोजी पहाटे २ वाजण्याच्या सुमारास घडली. यादरम्यान घरातून आपल्या आईबरोबर लघुशंकेला उठलेल्या १३ वर्षीय एका मुलीवरदेखील त्याने धाव घेतली, पण सोबत असणाऱ्या आईने आरडाओरड केल्यानंतर तो पळून गेल्याने ती त्यातून वाचली आहे. पण या घटनेत तिलाही त्या प्राण्याचा नख लागल्याचे समोर आले आहे.

## तरुणांचा वाढलेला उत्साह निकाल ठरविणार



**अक्कलकोट :** अक्कलकोट विधानसभा मतदारसंघात झालेल्या मतदानाची टक्केवारी फायनल झाली असून, ६६.५० टक्के इतके मतदान झाल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी यांनी सांगितले. मागच्या वेळेपेक्षा यंदा टक्केवारी वाढलेली दिसली. तडवळ, कुंभारी भागात इतर भागांपेक्षा जास्त मतदान झाल्याचे आकडेवारीवरून दिसत आहे. स्थलांतरित मतदारांनी मूळगावी येऊन मतदानाचा हक्क बजावला आहे. एकंदरीत तरुण मतदार व स्थलांतरित मतदार यांच्या हातीच निकाल व मताधिक्य अवलंबून असणार आहे. तरुणांचा वाढलेला उत्साह निकाल ठरविणार आहे.

## 'एमआयएम'च्या आठ कार्यकर्त्यांवर गुन्हा; अद्याप कोणासही अटक नाही




**सोलापूर :** बुधवारी सकाळपासून विधानसभा निवडणुकीची मतदान प्रक्रिया सुरू होती. त्यादरम्यान उमेदवाराचे चिन्ह असलेल्या स्लिपा वाटल्याबद्दल 'एमआयएम' पक्षाच्या आठ कार्यकर्त्यांविरुद्ध दोन गुन्हे दाखल झाले आहेत. पहिली घटना बुधवारी दुपारी दीडच्या सुमारास कुर्बान हुसेन नगर येथे घडली. विधानसभा निवडणुकीची मतदान प्रक्रिया चालू असताना, निवडणुकीच्या ४८ तासांपूर्वी उमेदवाराचा प्रचार करण्यास, चित्रफिती लावण्यास, उमेदवाराचे फोटो व चिन्ह असलेले साहित्य आदी बाबींना मनाई करण्यात आली होती.




## मतदान केंद्रावरचा वाद पोहोचला पोलिस ठाण्यात

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**माळशिरस :** विधानसभेच्या मतदान प्रक्रियेत गोंधळ केल्याप्रकरणी दोन गटांविरुद्ध माळशिरस पोलिसात गुन्हे दाखल करण्यात आली आहेत. खुडूस येथील सरपंच विनायक ठवरे व योगेश ठवरे यांनी एकमेकांविरुद्ध माळशिरस पोलिसात गुन्हा दाखल केला आहे. खुडूस येथे बोगस मतदानासंदर्भात परस्परविरोधी फिर्यादी दाखल झाल्या असल्याने निवडणुकीवर ठपका पडला आहे. सरपंचांनी तीन चार अनोळखी इसमांना सोबत आणून बोगस मतदान केले, त्यांनी तुम्हाला अडवू शकत नाही असे म्हणून शिवीगाळ केली व जिवे मारण्याची धमकी दिल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. एकमेकांविरुद्ध पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला असून याबाबतचा अधिक तपास पोलिसांकडून करण्यात येत आहे. अद्याप कोणासही अटक करण्यात आली नसल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले.




## वारकऱ्यांच्या सेवेतून रेल्वेला ५० लाख मिळाले



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** कार्तिकी एकादशीसाठी पंढरपुरात दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची संख्या जास्त असते. यासाठीच मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाने कार्तिकी वारीसाठी वारकऱ्यांसाठी प्रवासाचे उत्तम नियोजन केले होते. वारीच्या काळात सोलापूर रेल्वे विभागाने एकूण एक लाख नऊ हजार २१० प्रवाशांना सुरक्षित सेवा दिली आणि या आयोजनातून ४९ लाख रुपयांचा महसूल कमावला, अशी माहिती रेल्वेने दिली.

**पाहिजे**

**हॉस्पिटल मध्ये स्टाफ आणि मावशी**
**शिक्षण:- ANM \ GNM \ १२ वी पास**
**पत्ता:- कोडलकर हॉस्पिटल**
**लिंक रोड,पंढरपूर**
**फोन नंबर :- ८२९१३१५०८९**




## 1.00 कोटी लिटर इथेनॉलचा करणार पुरवठा

# युटोपियन शुगर्स इथेनॉल ब्लेंडिग प्रोग्रॅममध्ये सहभागी-रोहन परिचारक

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मंगळवेढा :** कचरेवाडी ता.मंगळवेढा येथील युटोपियन शुगर्स लि. कारखान्याच्या या गळीत हंगामातील प्रथम इथेनॉल टँकरचे पुजन कारखान्याचे चेअरमन उमेश परिचारक व मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन परिचारक यांच्या शुभहस्ते करण्यात आले. युटोपियन शुगर्सचा 2024-2025 हा अकरावा गळीत हंगाम नुकताच सुरु झाला आहे. युटोपियन शुगर्सने केंद्र शासनाच्या आवाहनास प्रतीसाद देत राष्ट्रीय स्तरावरील इथेनॉल ब्लेंडिंग प्रोग्रॅममध्ये सहभाग घेतला आहे. त्यानुसार सुमारे 1.00 कोटी लिटर इथेनॉलचा पुरवठा हिंदुस्तान पेट्रोलियम, भारत पेट्रोलियम, इंडियन ऑइल या कंपन्यानकडे करण्यात येणार असल्याचा मानस मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन परिचारक यांनी सांगीतले.

रोहन परिचारक म्हणाले, युटोपियन शुगर्सने मागील दहा हंगामात भरीव कामगिरी केली आहे. चालू गळीत हंगामात 6.00 लाख मे.टन ऊसाचे गाळप करणेचे उद्दिष्ट ठेवले आहे. कारखान्याने पेट्रोलियम कंपन्याकडे 1.00 कोटी लिटर इथेनॉल निर्मितीची निविदा भरलेली आहे. पेट्रोलियम कंपन्यांनी कारखान्यास ऊसाच्या रसापासुन 40 लाख लिटर व बी हेवी मोलॅसेस पासून 60 लाख लिटर इथेनॉल निर्मिती व पुरवठा करणेस मान्यता दिलेली आहे. ऊसाच्या रसापासुन इथेनॉल निर्मिती करताना 1.30 इतकी रिकव्हरी खर्च होत आहे तसेच बी हेवी मोलॅसेस पासून इथेनॉल निर्मिती करताना 1.35 इतकी रिकव्हरी खर्च होत आहे. इथेनॉल विक्रीच्या मिळणाऱ्या रकमेतुन ऊस उत्पादकांना वेळेत ऊस बिल रक्कम अदा करणे पुढील काळात शक्य होणार आहे. यावेळी कारखान्याचे चेअरमन उमेश परिचारक, मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन परिचारक, चिफ फायनान्सियल ऑफीसर दिनेश खांडेकर, जनरल मॅनेजर (टेक.) सुधिर गाढवे, डिस्टलरी मॅनेजर महेश निंबाळकर, मुख्य शेती अधिकारी धनंजय व्यवहारे, चिफ केमिस्ट चंद्रकांत विभुते, सिव्हिल इंजिनिअर अनिल भोसले आदी खातेप्रमुख तसेच राज्य उत्पादन शुल्क विभाग अभिजीत सुर्यवंशी, मनोज सावंत व कामगार उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार ई.डी.पी. मॅनेजर अभिजीत यादव यांनी मानले.




**सोलापूर :** 249-सोलापूर शहर मध्य विधानसभा मतदारसंघाच्या मतमोजणी केंद्राचे ठिकाण- नुतन मराठी विद्यालय, 156-बी रेल्वे लाईन, डफरीन चौक सोलापूर हे असणार आहे. या मतदारसंघात 53. 36 टक्के मतदान झाले आहे. सोलापूरच्या खासदार प्रणिती शिंदे यांनी या मतदारसंघाचे सलग तीन वेळा नेतृत्व केले आहे. त्यामुळे हा मतदारसंघ काँग्रेस आपल्या वर्चस्वाखाली ठेवणार का याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### स्वेरीत पाचवा 'मासिक योग दिन' साजरा

# योगामुळे कार्यक्षमता वाढते -आर्ट ऑफ लिव्हिंगच्या साध्वी तत्वमयी

■ पंढरीसंचार न्यूज नेटवर्क



**पंढरपूर :** 'नियमित योग केल्याने आपले मन प्रसन्न राहते. हाती घेतलेल्या कार्यात सकारात्मकता निर्माण होते, उत्साह वाढतो व आपल्या कार्य करण्याच्या क्षमतेत कमालीची वाढ होते.' असे प्रतिपादन आर्ट ऑफ लिव्हिंगच्या साध्वी तत्वमयी यांनी केले.

प्रत्येक वर्षी दि.२१ जून रोजी 'जागतिक योग दिन' हा आंतरराष्ट्रीय स्तरावर अर्थात जगभरात साजरा केला जातो. दि.२१ जून रोजी स्वेरीत मुख्य 'जागतिक योग दिन' साजरा करण्यात आला. यावेळी स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांनी यापुढेही 'स्वेरी अंतर्गत असलेल्या वसतिगृहातील विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक महिन्याच्या दि.२१ तारखेला सामुहिक 'योग दिन' साजरा करण्याचे घोषित केले होते. तेंव्हापासून प्रत्येक महिन्याच्या दि. २१ तारखेला न चुकता स्वेरीत 'योग दिन' घेतला जातो. गुरुवार, दि. २१ नोव्हेंबर २०२४ हा स्वेरीमध्ये 'पाचवा योग दिन' साजरा करण्यात आला. अभियांत्रिकीच्या दुसऱ्या, तिसऱ्या व अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांना पीएल (पेपर लिव्ह) निमित्त सुट्टी आहे तरीही यामध्ये खंड न पडता 'योगा' घेण्यात आला. या उपक्रमाला प्रथम वर्ष अभियांत्रिकी व वसतीगृहातील सर्व विद्यार्थ्यांनी प्रचंड प्रतिसाद दिला. डॉ.एन.पी. कुलकर्णी यांनी आर्ट ऑफ लिव्हिंगच्या साध्वी तत्वमयी यांचे स्वागत करून कार्यक्रमाचे प्रास्तविक केले. प्रार्थनेने सुरवात करून साध्वी तत्वमयी यांनी विद्यार्थी, विद्यार्थिनी, प्राध्यापक यांच्याकडून पुढे तासभर विविध प्राणायम करवून घेतले. सूर्यनमस्कार सह विविध आसने, भस्रीका प्राणायम तसेच श्वास, फुफुस्से, शरीराच्या विविध अवयवांच्या हालचालीसाठी योगाचे विविध प्रकार करून घेतले. या योग सरावानंतर सर्वांच्या चेहऱ्यावर अधिक उत्साह दिसून येत होता. मार्गदर्शन करताना अनुयायी साध्वी तत्वमयी पुढे म्हणाल्या की, 'योग हा शरीर, स्वास्थ्य आणि मनाच्या एकाग्रतेबरोबर शरीराच्या प्रत्येक अवयवाचा व्यायाम करुन घेतो. त्यामुळे मन, शरीर आणि आत्मा संतुलित राहण्यासाठी नियमित योगाची गरज आहे तसेच ध्यान केल्यामुळे मनाची एकाग्रता वाढते. नियमितच्या कामामुळे नकळत ताण- तणावामुळे मनाची अवस्था बदलते. म्हणून मानसिक शांतीसाठी नियमित योगा करणे आवश्यक आहे.' असे सांगून 'योगा' चे फायदे सांगितले. सदरचा कार्यक्रम स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली, स्वेरीचे कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम.एम.पवार यांच्या सहकार्याने, बी.फार्मसीचे प्राचार्य डॉ. मिथुन मणियार, डिप्लोमा इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.एन.डी. मिसाळ, डी.फार्मसीचे प्राचार्य प्रा. सतीश मांडवे, इंजिनिअरिंगच्या उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार यांच्या नेतृत्वाखाली, विद्यार्थी अधिष्ठाता डॉ.महेश मठपती, सर्व अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, विद्यार्थी, विद्यार्थिनी यांच्या उपस्थितीत पार पडला. प्रथम वर्ष अभियांत्रिकीचे विभागप्रमुख डॉ.यशपाल खेडकर यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले.

## मोहोळच्या निकालाकडे सर्वांचे लक्ष



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मोहोळ :** मोहोळ विधानसभा मतदारसंघांत गत पंचवार्षिक निवडणुकीपेक्षा मतदानाची टक्केवारी वाढलेली दिसत आहे. ४० वर्षे एक हाती सत्ता ताब्यात ठेवलेले माजी आमदार राजन पाटील यांच्यासह विद्यमान आमदार यशवंत माने यांना यश मिळणार का, लोकसभेच्या निवडणुकीनंतर अनगर अप्पर तहसील कार्यालयाच्या मुद्द्यासह काँग्रेस पार्टी आणि शरद पवार गटाच्या माध्यमातून दिलेली उमेदवारी आणि राजन पाटलांच्या विरोधात एकत्रित आलेले सर्व विरोधकांकडे कौल जाणार याची उत्सुकता लागली आहे.

» पान १ वरुन

## सत्ता स्थापनेसाठी महायुती,आघाडी...

एक स्वतंत्र नीती तयार केली आहे. यासाठी भाजपाने तर वेगळा बी प्लॅन तयार केला असल्याचे जाहीरपणे सांगितले आहे. त्यामुळे या सत्तेच्या समीकरणात अपक्षांचा भाव वधारला असल्याचे दिसून येते.

कायदेतज्ञ व घटनातज्ञ श्री. बापट यांनी ३५६ कलमा खाली जर तीन दिवसाच्या आत राज्यपालांकडे कोणीही सत्तेचा दावा केला नाही तर नाईलाजाने राज्यपालांना राष्ट्रपती राजवट आणावी लागेल. महाराष्ट्राच्या दृष्टीने राज्याच्या प्रगतीसाठी ज्यांना ज्यांना सत्तेवर बसायचे आहे त्यांनी पक्षांतर्गत गटबाजीचा बिमोड करुन एकसंघ शक्ती पुढे आणली पाहिजे असा आग्रह करताना दिसतात.

मुंबईल्या कांही राजकीय पक्षाच्या तंज्ञाच्या मते निवडणूकीतील रणनीतीचे किंगमेकर शरद पवार हे शेवटच्या क्षणी कोणतीही भूमिका घेऊ शकतात हे भाजपाच्या एका खासदारांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले. याविधानामुळे अजित पवार राष्ट्रवादी अजित पवार गटात थोडीशी चलबिचल होताना दिसते. दिल्लीतल्या काँग्रेसच्या नेत्यांनी नाना पटोले यांना बारकाईने लक्ष ठेवून राजकीय वाटचाल करा आणि व्यवस्थेत कोठे कमतरता होणार नाही याची दक्षता घ्या असे स्पष्ट आदेश दिले आहेत. निरीक्षक चेन्नीथाला यांच्या मार्गदर्शनाखाली रणनीती आणि चर्चा होताना दिसत आहे. आज सागर बंगल्यावर सुद्धा बरीच धावपळ होताना दिसत असून दुपारच्या सुमारास गिरीष महाजन, प्रविण दरेकर, प्रसाद लाड आणि स्वतः फडणवीस यांच्यात महत्वपूर्ण चर्चा झाल्याचे वृत्त समोर येताना दिसत आहे. दुपारी १ ची ही वेळ भाजपाची अखेरची ही रणनीती ठरविण्याची वेळ असावी असे गृहीत धरले जात आहे. दरम्यान दिल्लीतील जे.पी.नड्डा यांच्या निवासस्थानी भाजपाच्या कोअर कमिटीची बैठक आयोजित कली असून तिथूनच महाराष्ट्रातील पक्ष प्रमुखांशी चर्चा होत असताना सागर बंगल्याच्या परिसरात चर्चिले जात आहे.

## भरदिवसा घरफोडी करणाऱ्याला ठोकल्या बेड्या



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**बार्शी :** बार्शी शहरातील बुरुड गल्ली परिसरात दिवसाढवळ्या तब्बल साडेचार लाख रुपयांची धाडसी घरफोडी करणाऱ्या आरोपीला बार्शी शहर पोलिसांच्या गुन्हे शोध पथकाने अवघ्या 24 तासात अटक केली आहे. नागेश राजु बगाडे (रा. बार्शी ता. बार्शी जि. सोलापुर) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. त्याच्याकडून चोरी केलेला 4 लाख 29 हजार 250 रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. अशी माहिती बार्शी शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे यांनी दिली.

## दोन वर्षे पूर्ण...

पंढरी संचार छायाचित्र सेवा



**सोलापूर :** सोलापूर महानगरपालिकेच्या आयुक्त शितल तेली-उगले यांनी सोलापूर महानगरपालिकेच्या आयुक्तपदी दोन वर्षे पूर्ण केल्याबद्दल तसेच अनेक कामे महापालिकेच्या पन्नास वर्षांमध्ये झाली नाहीत परंतु या दोन वर्षात त्यांनी करून दाखविली याबद्दल त्यांचा माजी गटनेते आनंद चंदनशिवे यांनी पुष्पगुच्छ देवून सत्कार केला. यावेळी माजी नगरसेवक पुजारी हे उपस्थित होते.

Selected

## जिल्ह्यात मतमोजणी केंद्र परिसरात कलम 163 लागू



**सोलापूर :** सोलापूर जिल्ह्यातील अकरा विधानसभा मतदारसंघात मतदानाची प्रक्रिया पार पडली असून उद्या दि. 23 नोव्हेंबर 2024 रोजी मतमोजणी होणार आहे. ही निवडणूक प्रक्रिया विनाअडथळा व भयमुक्त वातावरणात पार पाडली जाणे आवश्यक आहे. यासाठी जिल्ह्यातील सर्व मतमोजणी केंद्र परिसरात जिल्हादंडाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी, सोलापूर कुमार आशीर्वाद यांनी भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम 163 लागू केले आहे. त्या अनुषंगाने मतमोजणी ठिकाणाच्या 200 मीटरच्या परिसरामध्ये विविध प्रकारचे गैरशिस्त वर्तन करण्यास मनाई करण्यात येत आहे.

## महापरिनिर्वाण दिनानिमित्त विशेष गाड्या सोडा

**सोलापूर :** विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिना निमित्त दरवर्षी हजारो अनुयायी चैत्यभूमी, मुंबई येथे बाबासाहेबांना अभिवादन करण्यासाठी जात असतात. सोलापूर व आसपासच्या भागातून हजारो अनुयायी 5 डिसेंबर रोजी मुंबईकडे प्रस्थान करतात. मात्र, अनुयायांची संख्या दरवर्षी वाढत असून, प्रवास सोयीस्कर व सुरक्षित करण्यासाठी यंदा रेल्वे प्रशासनाकडे बहुजन समाज पार्टी, सोलापूरच्या वतीने काही महत्त्वाच्या मागण्या करण्यात आल्या आहेत. यामध्ये स्लिपर कोचची व्यवस्था असलेल्या गाड्या सोडण्याची मागणी करण्यात आली.

**दि पंढरपूर मर्चन्टस् को-ऑपरेटिव्ह बँक लि. पंढरपूर**

**नोटीस**

आमचे बँकेचे खालील मयत खातेदार यांचे नावावर असलेल्या सेव्हिंग ठेव खात्याचे वारस हक्काने नांव दाखल करणेबद्दल मयताचे वारसदाराने बँकेकडे विनंती अर्ज केला आहे. या विनंती अर्जाप्रमाणे अर्जदाराचे नांव वारस हक्काने दाखल करणेस अन्य वारसदारांनी लेखी संमती दिलेली आहे. तरी सदर मयतास अर्जदार यांनी अर्जात नमूद केलेल्या वारसा व्यतिरिक्त अन्य कोणी वारसे, हक्कदार, मत्युपत्र चालविणारे वगैरे असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध केले तारखेपासून सात दिवसाचे आत बँकेकडे लेखी कळवावे. सदर मुदतीत कोणाची कसल्याही प्रकारची लेखी तक्रार न आल्यास अर्जदार अर्जात नमूद केले व्यतिरिक्त अन्य कोणी वारस नाहीत असे समजून अर्जाराचे नांव वारस हक्काने दाखल करणेत येईल.

कळावे !

| मयत खातेदाराचे नांव | वारसाचे नांव |
| --- | --- |
| विठ्ठल बाळु ढोपे | कलावती विठ्ठल ढोपे |

दि. २२/११/२०२४

सही/-
मॅनेजर
दि पंढरपूर मर्चन्टस् को-ऑप बँक लि., पंढरपूर

## अनिल सावंत यांचा भालकेंवर हल्लाबोल



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** मंगळवेढा-पंढरपूर मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष व काँग्रेस यांच्यामध्ये विचारांचे हेवेदावे मागेपुढे झाले आहेत. यामध्ये मतदारांना संभ्रम होऊ नये म्हणून महाविकास आघाडीचे उमेदवार म्हणून मी उमेदवार असल्याचा खुलासा केलेला आहे. आता आपला विरोधक फक्त आणि फक्त भाजप आहे आणि विद्यमान आमदार आहेत. गतवेळी मतदारांनी त्यांच्यावरती विश्वास ठेऊन त्यांना मतदान केले, पण त्यांनी काय केले? जेवढा निधी आणला त्याच पद्धतीचा विकास झाला नाही.

## उच्चांकी मतदानामुळे निकालाची उत्कंठा वाढली



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सांगोला :** सांगोला विधानसभा मतदारसंघ जिल्ह्यात उच्चांकी ७८.१४ टक्के मतदान झाल्यामुळे निकालाची उत्कंठा वाढली आहे. यंदाच्या निवडणुकीत वाढलेली मतदानाची टक्केवारी व सुमारे १ लाख २४ हजार ३५२ महिला मतदारांनी उत्सुकतेने केलेले मतदान याचा फायदा कोणाला होणार, याकडे लक्ष लागले आहे. सांगोला विधानसभा निवडणुकीसाठी १३ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात होते मात्र खरी लढत शिंदेसेनेचे उमेदवार आमदार शहाजी बापू पाटील, उद्धवसेनेचे उमेदवार दीपक आबा साळुंखे-पाटील व शेकापचे उमेदवार डॉ. बाबासाहेब देशमुख यांच्यात तुल्यबळ तिरंगी लढत होती.

## वयोवृद्ध महिलेचा खून, आरोपीला जन्मठेपेची शिक्षा



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**माढा :** माढा तालुक्यातील मौजे सुरली येथील फिर्यादी मुकुंद चव्हाण यांच्या शेताजवळ असलेल्या समाधान सरडे यांच्या शेतात काम करणाऱ्या आरोपी कृष्णा दादासाहेब कांबळे याने मोबाईलच्या वादातून वयोवृद्ध महिलेचा खून केला. न्यायालयाने पुराव्यांचा विचार करून आरोपी कृष्णा दादासाहेब कांबळे याला भादविक 302 अन्वये दोषी ठरवले आणि त्यास जन्मठेपेची शिक्षा आणि 15,000 रुपये दंड ठोठावला.

## निवडणूक निकालात वाढलेला टक्का कोणाला तारणार ?



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** माढा विधानसभेची यंदाची पंचवार्षिक निवडणूक ही चुरशीची झाली असून एकूण मतदान ७५.९० टक्के झाले आहे. त्यामुळे गेल्या पंचवार्षिक निवडणुकीपेक्षा यंदाच्या निवडणुकीत सरासरी मतदानाचा मोठा टक्का वाढल्याने नेमका याचा फायदा कोणाला होणार? याकडे कार्यकर्त्यांसह सर्वांचे लक्ष लागले आहे. याबाबत स्वतः उमेदवारांसह गावोगावचे पुढारीदेखील आकडे-मोडीच्या खेळात रमल्याचे दिसत आहे. येथील सर्व उमेदवारांचे भवितव्य हे व्हीव्हीपॅट मशीनमध्ये सील बंद झाले असून २३ तारखेच्या मतमोजणीतून ते ओपन होणार आहे.

## लोकसहभागातून संगणक कक्षाची निर्मिती



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळा करंजे-भालेवाडी येथील शाळेत माजी विद्यार्थी व गावातील होतकरू कार्यकर्ते यांच्या लोक सहभाग संकल्पनेतून संगणक कक्षाची निर्मिती करण्यात आली. भाऊबीजेचे औचित्य साधून सकाळी ठीक ११. ३० वाजता हभप श्री नामदेव वासकर, साकतकर महाराज यांच्या शुभहस्ते फीत कापून संगणक कक्षाचे उद्‌घाटन करण्यात आले. शाळेच्या स्वतंत्र दालनात दहा पैकी पाच संगणक संच स्थापित करून सुरवात करण्यात आली.

## कुईवाडीसह ३६ गावे ठरणार गेमचेंजर

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**करमाळा :** करमाळा विधानसभा निवडणुकीत ३ लाख २८ हजार ९९४ मतदारांपैकी २ लाख २९ हजार ३७५ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला असून ६९.७२ टक्के मतदान झाले. मतदारसंघात समाविष्ट असलेल्या माढा तालुक्यातील कुडूवाडी सह ३६ गावांतून झालेले मतदान निवडणूक निकालात निर्णायक ठरणार आहे. मागील २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत आ. संजय मामा शिंदे यांना कुडूवाडी सह ३६ गावांतील मताधिक्यामुळेच विजय मिळवता आला होता. यावेळी २०२४ च्या निवडणुकीत मागच्या २०१९ च्या निवडणुकीच्या तुलनेत टक्केवारी घसरली असली, तरी मतदान वाढले आहे.

### अंतर महाविद्यालयीन ज्युदो स्पर्धेत

# कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयाचे यश

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या अंतर महाविद्यालयीन ज्युदो स्पर्धेत येथील रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील स्वायत्त महाविद्यालयाने घवघवीत यश मिळविले.

ही स्पर्धा के. एन. भिसे महाविद्यालय कुर्डूवाडी येथे नुकतीच पार पडली.

या स्पर्धेत विद्यापीठातील एकूण आठरा महाविद्यालयांनी सहभाग नोंदविला होता.

यामध्ये कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयाच्या सहा विद्यार्थी खेळाडूंनी सहभाग घेतला होता. त्यापैकी चार विद्यार्थ्यांनी यश संपादन केले.

यामध्ये ७३ किलो वजनी गटात चंद्रिका बाबर बी.एससी भाग २ हिने प्रथम क्रमांक मिळविला. त्यामुळे तिची भोपाळ येथे होणाऱ्या ऑल इंडिया इंटर युनिव्हर्सिटी वेस्ट झोन स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे. तसेच




जयदीप पवार ६० किलो वजनी गटात द्वितीय क्रमांक, पवन रुपनर १०० किलो वजनी गटात द्वितीय क्रमांक, दिव्यसाक्षी धोत्रे ५६ किलो वजनी गटात द्वितीय क्रमांक प्राप्त केला. या स्पर्धेत यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांचे रयत शिक्षण संस्थेच्या मध्य विभागीय सल्लागार समितीचे चेअरमन संजीव पाटील, प्राचार्य डॉ. चंद्रकांत खिलारे, महाविद्यालय विकास समितीमधील सर्व सदस्य, उपप्राचार्य डॉ. भगवान नाईकनवरे, उपप्राचार्य डॉ. तुकाराम अनंतकवळस, उपप्राचार्य प्रा. राजेश कवडे, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षचे समन्वयक डॉ. अमर कांबळे व स्वायत्त महाविद्यालय समन्वयक डॉ. मधुकर जडल यांनी विशेष अभिनंदन केले.

या यशस्वी विद्यार्थ्यांना प्रा. विठ्ठल फुले, प्रा. मनोज खपाले व प्रा. अनिल परमार यांचे मार्गदर्शन लाभले.

यशस्वी विद्यार्थ्यांचे महाविद्यालयीन क्षेत्रात सिनिअर विभागातील प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर सेवक यांनी विशेष कौतुक केले.

पंढरी संचार

# भ्रष्टाचाराने गाठला कळस!

झारखंड व महाराष्ट्र विधानसभा तसेच विविध पोटनिवडणुकांत भ्रष्टाचाराने कळस गाठल्याचे दिसून आले आहे. निवडणूक आचारसंहिता लागू झाल्यापासून रोख रक्कम, अमली पदार्थ आणि मौल्यवान धातू अशा स्वरूपात सुमारे १०८२ कोटींहून अधिक रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. महाराष्ट्र व झारखंडमधील जप्ती ही २०१९ सालच्या निवडणुकीत हस्तगत करण्यात आलेल्या मुद्देमालाच्या तुलनेत ७ पट अधिक आहे, अशी माहिती निवडणूक आयोगाने दिली आहे. यंदाच्या निवडणुकीत कायदा अंमलबजावणी व पोलिसांनी केलेल्या कारवाईत महाराष्ट्र व झारखंडमध्ये एकूण ८५८ कोटींची सामग्री जप्त झाल्याची नोंद आहे. २०१९ च्या निवडणुकीत हाच आकडा महाराष्ट्रात १०३ कोटी तर झारखंडमध्ये १८ कोटी एवढा होता. जप्त झालेल्या मुद्देमालात रोकड, दारू, अमली पदार्थ व मतदारांना प्रलोभन दाखविण्यासाठी आणलेल्या मोफत भेटवस्तूंचा समावेश आहे. महाराष्ट्रातील सर्वच जिल्ह्यांमध्ये मुद्देमाल सापडला, जो गत विधानसभा निवडणुकीपेक्षा खूप अधिक आहे. पालघर जिल्ह्यातील वाडा पोलिस ठाण्याच्या हद्दीत एका जीपमधून ३.७० कोटी रुपयांची रोकड, बुलडाणा जिल्ह्यातील जामोद येथे ४.५१ कोटी रुपये किमतीच्या गांजाची रोपे जप्त करण्यात आली. रायगडमध्ये ५.२० कोटी रुपयांच्या चांदीच्या छड्या हस्तगत करण्यात आल्या. झारखंडमध्ये पोलिसांनी बेकायदेशीर खाणकामांना आळा घालण्यावर जोर दिला होता. यात बेकायदेशीर खाण साहित्य आणि मशिन जप्त करण्यात आल्या. शेजारच्या राज्यातून आणल्या जाणाऱ्या अमली पदार्थांवर पोलिसांची नजर होती. झारखंडच्या डाल्टनगंज जिल्ह्यात ६८७ किलो अफूचे स्ट्रॉ तर हजारीबागमध्ये ४८.१८ किलो गांजा जप्त करण्यात आला. महाराष्ट्रात प्रचारादरम्यान आचारसंहिताभंगाच्या सुमारे ९ हजार तक्रारी दाखल झाल्या तर राज्य व केंद्र सरकारच्या विविध अंमलबजावणी यंत्रणांनी रोख रक्कम, अमली पदार्थ, मौल्यवान धातू असा सुमारे ७०० कोटींचा ऐवज जप्त केल्याची माहिती मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने दिली आहे. ही आकडेवारी छाती दडपून टाकणारी आहे. निवडणूक काळात भ्रष्टाचाराने कसा कळस गाठला हेही या निमित्ताने उघड झाले आहे. अर्थात ही पकडली गेलेली मालमत्ता आहे. प्रत्यक्षात याच्या कितीतरी पट रक्कम भ्रष्ट कार्यकर्त्यांपर्यंत पोहोचली असावी. त्याचा अंदाज लावणे कठीण आहे. राजकारण्यांकडून होणारे हजारो कोटींचे घोटाळे ही आता काही आश्चर्याची अथवा धक्कादायक गोष्ट राहिलेली नाही. जनतेच्या पैशावर डल्ला मारून लोकप्रतिनिधी म्हणवणारे आपल्या पिढ्यांची तजवीज कशी करून ठेवतात ते आता काही लपून राहिलेले नाही.सारेच लोकप्रतिनिधी तसे असतात असे नाही. काही अपवादही असतात, त्याशिवाय नियम सिद्ध होत नाही. पूर्वी काही राजकारणी आपले घोटाळे दडवण्याचे प्रयत्न करत, आताचे मात्र इतके निर्ढावलेले आहेत की, त्यांच्या मनाला अपराधीपणाची भावना शिवतही नाही. कोणत्या विकासकामात किती टक्के संबंधित लोकप्रतिनिधीला पोहोचवले ते तो ठेकेदारच गावभर सांगत फिरतो! जनतेच्या हितासाठी आपण राजकारणात असल्याचे भासवत हे राजकारणी विकासाच्या नावाखाली स्वत:चा विकास करून घेत असतात. अर्थात अशी चर्चा होण्यामागचे मुख्य कारण म्हणजे यंदाच्या निवडणुकीत भ्रष्टाचाराने गाठलेला कळस! त्यात भर पडली ती भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे यांच्या कर्तृत्वाची. विधानसभा निवडणुकीच्या मतदानाच्या पूर्वसंध्येला विरारमधील 'हॉटेल विवांता' मध्ये विनोद तावडे व त्यांचे सहकारी पैसे वाटप करीत असल्याचा आरोप बहुजन विकास आघाडीने (बविआ) केला. तावडे यांच्यावर झालेल्या या गंभीर आरोपामुळे दिवसभर राजकीय वर्तुळात खळबळ उडाली. भाजपमधील अंतर्गत राजकारणात तावडे यांचा 'गेम'झाल्याची चर्चाही दिवसभर रंगली होती. बविआच्या कार्यकर्त्यांनी सुमारे साडेचार तास आक्रमक पवित्रा घेत हॉटेलमध्ये गोंधळ घातला. त्यावेळी करण्यात आलेल्या तपासणीत एका खोलीतून ९ लाखांची रोकड निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी जप्त केली. तावडे यांच्यासह भाजपचे उमेदवार राजन नाईक आणि अन्य पदाधिकाऱ्यांवर तीन वेगवेगळे गुन्हे दाखल करण्यात आले. तावडे यांनी सर्व आरोप फेटाळले आहेत. निवडणुका जिंकण्यासाठी साम, दाम, दंड, भेद याचा वापर भाजप करत आहे. पैसे वाटताना विनोद तावडे यांना पकडल्यामुळे भाजपचा 'नोट जिहाद' समोर आला आहे अशी टीका उद्धव ठाकरे यांनी केली. मोदीजी हे पाच कोटी कोणाच्या 'सेफ'मधून (तिजोरी) आले. सार्वजनिक पैशांची लूट करून तुमचा 'टेम्पो' कोणी पाठवला? महाराष्ट्रात मतदानाच्या तोंडावर पैशाच्या बळावर मतदारांना प्रभावित करण्याचा प्रयत्न आहे. यात सामान्य कार्यकर्त्यापासून मोठमोठे नेते सहभागी आहेत अशी टीका राहुल गांधी यांनी केली. भाजप कार्यकर्त्यांच्या भेटीसाठी गेलेल्या विनोद तावडे यांच्यावर पैसे वाटल्याचा बिनबुडाचा आरोप करण्यात येत असून, पराभवाच्या भीतीने विरोधकांच्या पायाखालची वाळू सरकली आहे. त्यामुळेच षडयंत्र करून तावडे यांना बदनाम करण्यात येत असल्याचे भाजपचे प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांनी म्हटले आहे. असो. यंदाच्या निवडणुकीतील भ्रष्टाचार पाहता 'भ्रष्टाचार हाच शिष्टाचार' झाला आहे यात शंका नाही. मागच्या विधानसभा निवडणुकीत १२२ कोटी रुपयांची मालमत्ता जप्त करण्यात आली होती. त्या तुलनेत यंदाच्या निवडणुकीत जप्त करण्यात आलेली मालमत्ता पाहता भ्रष्टाचार किती वेगाने वाढतोय ते लक्षात येते. अर्थात याला केवळ राजकारणीच दोषी आहेत असे नाही. शेकडो कोटींची ही रक्कम कुठे जाणार होती ते स्पष्ट आहे. सत्ताधाऱ्यांनी जनतेला लुटायचे आणि जनतेने त्यातील काही तुकड्यांवर समाधान मानायचे असे हे दुष्टचक्र आहे. यालाच 'यथा राजा तथा प्रजा' असे म्हणायचे! साधी ग्रामपंचायतची निवडणूक लढवायची झाल्यास एखाद्या कोटीची उधळण करावी लागते. त्यामुळे विधानसभेसारख्या निवडणुकीत कोटीच्या कोटी उड्डाणे होणारच! हे सारे भयानक वास्तव आहे. ते बदलण्यासाठी जनतेनेच उठाव करण्याची गरज आहे.

**जम्मू-काश्मीरमध्ये पुन्हा एकदा दहशतवादी घटनांमध्ये वाढ होत आहे. जोपर्यंत राज्यपाल राजवट होती, तोपर्यंत या केंद्रशासित प्रदेशात निवडून आलेले सरकार नसल्याचा आरोप तेथील राजकीय पक्ष करत असत. आता राज्यात निर्वाचित बहुमताचे सरकार असतानाही खोऱ्यात दहशतवादाच्या घटना कमी होत नाहीत. मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांच्या शपथविधीनंतर एक मोठी दहशतवादी घटना घडली ज्यामध्ये परदेशी कामगारांना लक्ष्य करण्यात आले. आता दहशतवाद्यांनी गर्दीच्या बाजारपेठेत ग्रेनेडने हल्ला करून दहशत पसरवण्याचा प्रयत्न केला आहे. यावर्षी जून ते सप्टेंबरपर्यंत जम्मूमध्ये १२ दहशतवादी हल्ले झाले, ज्यात १४ जवान शहीद झाले, तर ४ दहशतवादी मारले गेले. यावर्षी दहाहून अधिक नागरिकांचा बळी गेला आहे. २००८ नंतर पहिल्यांदाच जम्मू-काश्मीरमध्ये दहशतवादी हल्ले सातत्याने वाढले आहेत. केंद्र सरकार याबाबत गांभीर्याने विचार करणार का?**

# काश्मीर पुन्हा धगधगतंय...

जम्मू काश्मीरमध्ये नवे सरकार स्थापन झाल्यानंतर खोऱ्यात शांतता आणि विकासाकडे वाटचाल होण्याची अपेक्षा बाळगली जात असताना पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादी मात्र त्यात खोडा घालण्याचे षड्यंत्र रचत आहेत. पाकिस्तानची गुप्तचर संघटना आयएसआय आणि दहशतवादी संघटनांनी जम्मू काश्मीरमध्ये पुन्हा एकदा अस्थैर्य निर्माण करण्याचा प्रयत्न सुरू केला असून हल्ल्यांचे प्रमाण वाढविले आहे. जम्मू काश्मीरमध्ये सुरक्षा दलाचे जवान प्राणाची आहुती देत आहेत. किश्तवाड येथील चकमकीत लष्कराचे जेसीओ राकेशकुमार हुतात्मा झाले आणि तीन जवान जखमी झाले. एवढेच नाही तर परप्रांतातील मजुरांना, नागरिकांचे 'टार्गेट किलिंग' केले जात आहे.

अर्थात या हल्ल्यांचा उद्देश स्पष्ट आहे आणि तो म्हणजे केंद्रशासित राज्यात परप्रांतियांच्या कामगारांत भिती निर्माण करणे आणि सुरक्षा दलांच्या असमान प्रतिसादाला चिथावणी देण्यासाठी कारस्थान रचणे. हे तंत्र संघर्षग्रस्त राज्यांत दहशतवाद्यांकडून नेहमीच वापरले जाते. खोऱ्याचे प्रशासन सांभाळणाऱ्या नायब राज्यपालांच्या कार्यालयाने आणि नॅशनल कॉन्फरन्सचे नवनिर्वाचित सरकारने काश्मीरमध्ये विविध ठिकाणी सुरक्षा दलाकडून दहशतवाद्यांना टार्गेट करताना स्थानिक समुदायाविरुद्ध दमनकारी भूमिका घेण्यास प्रवृत्त करणाऱ्या दहशतवाद्यांच्या जाळ्यात आपले जवान अडकणार नाहीत, याची खबरदारी घ्यायला हवी. फुटिरतावादी नेत्यांसह काश्मीरच्या राजकीय नेत्यांनी नागरिकांवरील हल्ल्यांचा तीव्र निषेध केला आहे आणि तसा संदेश दहशतवाद्यांना थारा देणाऱ्या समाजकंटकांपर्यंत संदेश जाणे आवश्यक आहे.

काश्मीर खोऱ्यातून कलम ३७० हटविल्यानंतर प्रदेशातील काही नागरिकांत नाराजी आहे, हे नाकारुन चालणार नाही. परंतु या स्थितीने आतापर्यंत १९९० च्या दशकातील अराजकतेते रुप धारण केले नाही. तत्कालिन काळात सर्वत्र दहशतवाद आणि दहशतवादच दिसत होता. आता राज्यात नवे सरकार स्थापन झाल्यानंतर प्रशासन दहशतवाद्यांत फाटाफूट करण्याचे तंत्र अंगीकारू शकते आणि त्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न करायला हवेत. राज्याच्या सुरक्षा आढाव्याच्या माध्यमातून परप्रांतिय कामगारांच्या सुरक्षेचे वातावरण तयार करण्याचा उपक्रमही हाती घ्यायला हवा. दहशतवाद्यांत फूट पाडून त्यांना न्यायालयासमोर आणण्यासाठी नागरिकांना राजी करणेही गरजेचे आहे.

काही दिवसांपूर्वीच किश्तवाड जिल्ह्याच्या वरच्या भागात दहशतवाद्यांनी आयएसआयच्या इशाऱ्यावर दोन ग्रामरक्षकांची गोळ्या झाडून हत्या केली. तत्पूर्वी दोन सुरक्षा रक्षकांचे अपहरण करण्यात आले होते आणि त्यांच्या डोळ्यावर पट्टी बांधत त्यांची गोळ्या घालत हत्या केली. पाकिस्तानची दहशतवादी संघटना जैश ए महंमदशी संबंधित 'काश्मीर टायगर्स'ने या हत्येची जबाबदारी स्वीकारली. गेल्या काही काळापासून जम्मू काश्मीरच्या वेगवेगळ्या जिल्ह्यांत सुरक्षा दले किंवा परप्रांतिय मजुरांवर हल्ले करत दहशतवादी कायदा आणि सुव्यवस्थेला एकप्रकारे आव्हानच देत आहेत. प्रामुख्याने जम्मू काश्मीरमध्ये सरकार स्थापन झाल्यानंतर अशा घटनांत वाढ झाली आहे. दहशतवादावर खोऱ्यात राजकारण केले जात असले तरी जम्मू काश्मीरमधील जनतेला शांतता हवी आहे आणि त्यासाठी अजूनही ते आस लावून आहेत. परंतु ती प्रस्थापित न होऊ शकल्याने निर्माण होणारी निराशा हेच सतत होणाऱ्या हल्ल्याचे कारण स्पष्ट करत आहे.



सातत्याने करण्यात येणाऱ्या हल्ल्यांचा उद्देश हा राज्यातील पायाभूत सुविधा देणाऱ्या प्रकल्पांत अडथळे आणत विकासाला ब्रेक लावणे हा आहे. त्याचवेळी अन्य राज्यांतून आलेल्या कामगारांची हत्या करून भारताच्या संघराज्य व्यवस्थेला धक्का

**कर्नल अभय पटवर्धन,** निवृत्त

देण्याचे सुनियोजित षड्यंत्र दहशतवाद्यांकडून पाकिस्तानात बसलेल्या आपल्या आकाहांच्या आदेशावरुन सुरू आहे. या माध्यमातून अन्य राज्यांतील मजूर काश्मीरमध्ये काम करण्यासाठी येणार नाहीत, असे वातावरण तयार करण्याचा प्रयत्न दहशतवादी संघटनांकडून केला जात आहे. एकुणातच दहशतवादी संघटनांकडून जम्मू काश्मीरबाबत चुकीचा नॅरेटिव्ह सेट करण्याचा प्रयत्न केला जात आहे. संपूर्ण देशात काश्मीरबाबत चुकीचे चित्र निर्माण केले जात आहे. प्रत्यक्षात सुरक्षा दले आणि गुप्तचर संघटना या दहशतवादी संघटनांचा खात्मा करण्यासाठी प्रभावीपणे काम करत आहेत. सुरक्षा दलांकडून दहशतवाद्यांचा सफाया केला जात आहे. दहशतवाद्यांच्या नव्या आणि जुन्या छुप्या सहकाऱ्यांची ओळख पटविली जात आहे. आता हिवाळा सुरू झाल्याने पुढील तीन महिने दहशतवाद्यांविरोधातील लढाई निर्णायक स्थितीत असेल. जम्मू-काश्मीरमध्ये परदेशी दहशतवादी मोठ्या प्रमाणावर सक्रिय आहेत. या दहशतवाद्यांच्या कारवाया आणि भरती करण्याच्या पद्धतींमध्येही बदल होताना दिसत आहेत. सीमेवर घुसखोरी करण्याऐवजी अंतर्गत भागात दहशतवादी हल्ले करण्याची रणनीती त्यांनी आखली आहे. सद्यस्थितीत काश्मीरमध्ये ११९ दहशतवादी सक्रिय असल्याचे गुप्तचर यंत्रणांचे म्हणणे आहे. त्यापैकी ७९ पीर पंजालमध्ये असून यामध्ये१८ स्थानिक तर ६१ पाकिस्तानी आहेत. पीर पंजालच्या दक्षिणेस ४० सक्रिय दहशतवादी असून त्यापैकी ३४ पाकिस्तानी नागरिक आहेत, तर केवळ ६ स्थानिक दहशतवादी आहेत. दुसरीकडे काश्मीरच्या भूमीवर दहशतवादाचे पुनरुज्जीवन करण्यासाठी पाकिस्तान सोशल मीडियाचा आधार घेत आहे. गेल्या एक महिन्यापासून पाकिस्तान आणि पीओकेमधील दहशतवादी हँडलर सोशल मीडियावर भारतविरोधी पोस्ट टाकण्यासाठी सक्रिय झाले आहेत.

केवळ गेल्या एका महिन्यात (ऑक्टोबर-नोव्हेंबर) अशा २,००० हून अधिक पोस्ट पाहिल्या गेल्या आहेत. २०२३ मध्ये याच कालावधीत अशा केवळ ८९ पोस्ट पाहिल्या गेल्या. म्हणजेच यंदा यामध्ये २२ पटीने वाढ झाली आहे.भारताच्या तपास यंत्रणा याकडे स्थानिक पातळीवर दहशतवाद्यांची भरती पुन्हा सुरू करण्याचा नवा प्रयत्न म्हणून पाहत आहेत. आणखी एक चिंतेची बाब म्हणजे, जम्मू-काश्मीरमधील अखनूरमध्ये चकमकीत ठार झालेल्या तीन दहशतवाद्यांकडून अमेरिकन एम४ रायफल जप्त करण्यात आल्या आहेत. अफगाणिस्तानातून सैन्य माघारी घेत असताना अमेरिकन सैन्याने सोडलेल्या या प्राणघातक रायफल्स जम्मू-काश्मीरमधील दहशतवाद्यांपर्यंत कशा पोहोचत आहेत, याचा छडा लागणे गरजेचे आहे. याचे कारण या रायफलमध्ये बुलेटप्रूफ वाहनांनाही भेदण्याची क्षमता आहे. सीमा ओलांडून भारतात घुसणाऱ्या दहशतवाद्यांना ही शस्त्रे पुरवली जात असतील तर ते ते मजबूत वाहने आणि पायाभूत सुविधांचे मोठे नुकसान करू शकतात. एम ४ रायफल पहिल्यांदा जम्मू आणि काश्मीरमध्ये २०१७ मध्ये दिसली होती. सुरक्षा दलांनी जैश-ए-मोहम्मद प्रमुख मसूद अझहरचा पुतण्या तलहा रशीद मसूदला पुलवामा येथे ठार केले तेव्हापासून कठुआ, रियासी, पूंछ आणि राजौरी येथील हल्ल्यांसह अनेक दहशतवादी घटनांमध्ये एम४ रायफल्सचा वापर करण्यात आला आहे. एम-४ कार्बाइन ही हलकी वजनाची, गॅसवर चालणारी, एअर कूल्ड, मॅगझिन-फेड असॉल्ट रायफल आहे. प्रति मिनिट ७००-९०० राउंड फायर करण्यास ती सक्षम आहे. तिची फायरिंग रेंज किमान ५००-६०० मीटर आणि कमाल रेंज ३,६०० मीटर आहे. अमेरिकन सैन्याने अफगाणिस्तानमध्ये ७ अब्ज पेक्षा जास्त किमतीची लष्करी उपकरणे सोडली, ज्यात ३००,००० लहान शस्त्रे आणि हजारो एम ४ रायफल आहेत. ही शस्त्रे अफगाणिस्तानातून पाकिस्तानात पोहोचली आहेत. त्यामुळे भारतीय सुरक्षा दलांनी अधिक सतर्क राहण्याची गरज आहे. दहशतवादी संघटना या त्यांच्या कारस्थानात आणि मोडस ऑपरेंडीमध्ये सातत्याने बदल करत असल्याचे अलीकडील काळात प्रकर्षाने दिसून आले आहे. काश्मीरमधील समुदायांत धर्माच्या नावावर ध्रुवीकरण निर्माण करत आपल्या संघटनेसाठी नव्या तरुणांची भरती करण्याचे त्यांचे मनसुबे लपून राहिलेले नाहीत. परंतु, काश्मीरच्या जनतेने विधानसभा निवडणुकीती कट्टरपंथीय विचारांना पाठबळ देणाऱ्या उमेदवारांना आणि त्यांच्या विचारांना प्रोत्साहन देणाऱ्या शक्तींना नाकारत आपली भूमिका स्पष्ट केली आहे. त्यांना शांतता आणि सलोखा हवा आहे. यासाठी नवनिर्वाचित सरकारला कलम ३७० वर गोंधळ निर्माण करण्याऐवजी केंद्र सरकार अणि सुरक्षा दलाशी ताळमेळ ठेवत दहशतवाद्यांचे आव्हान मोडून काढण्यासाठी पुढाकार घ्यावा लागेल.

## गुड मॉर्निंग
दिवसाची अर्थपूर्ण सुरुवात

### पंचांग
**शनिवार, दिनांक २३ नोव्हेंबर २०२४**
कार्तिक कृ. ८, मघा, श्री शके १९४६, विक्रम संवत् २०८१, अनलनाम संवत्सर, दक्षिणायन, हेमंत ऋतू कालाष्टमी, श्री कालभैरव जयंती
**नक्षत्र** : मघा, योग : ऐंद्र सिद्ध, करण : बालव
**सूर्योदय :** स.०६.३१ सूर्यास्त : सायं. ०५.२९ वा.
**राहू काळ :** सकाळी : ९:०० ते १०:३०

### दिनविशेष
▶१८७२: नाट्याचार्य म्हणून प्रसिद्ध असलेले नामवंत मराठी नाटककार, पत्रकार कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर यांचा जन्म. ▶१८८२: उद्योगपती वालचंद्र हिराचंद्र यांचा जन्म. ▶१८९६: जत्रेत आढळणाऱ्या पाळणे गोल फिरवणारे आणि उंचावर नेणारे 'फेरिस व्हील' शोधणाऱ्या जॉर्ज वॉशिंग्टन मेल फेरिस याचा जन्म. ▶१८९७: नामवंत लेखक, तत्वचिंतक, संशोधक, इतिहासकार निराद्र चौधरी यांचा जन्म. १९५१ मध्ये 'ऑटोबायग्राफी ऑफ अॅन अननोन इंडिया' हे त्यांचे आत्मचरित्र प्रकाशित झाले. ▶१९००: प्रसिद्ध पत्रकार दुर्गादास यांचा जन्म. त्यांनी उत्कृष्ठ पत्रकारितेसाठी 'दुर्गारतन पुरस्कार' सुरू केला. तो भारतीय वृत्तपत्र व्यवसायात मानाचे चिन्ह मानण्यात येते. ▶१९१४: प्रख्यात उर्दू लेखक कृष्णचंद्र यांचा जन्म. ▶१९२३: झेप, झुंज आदी ऐतिहासिक कादंबऱ्या लिहिणाऱ्या ना. स. इनामदार यांचा जन्म. ▶१९३७: प्रसिद्ध शास्त्रज्ञ जगदीशचंद्र बोस यांचा स्मृतिदिन. ▶१९५९: नटवर्य चिंतामणराव कोल्हाटकर यांचे निधन. ▶१९९७: भारताच्या डयना हेडन ने मिस वर्ल्ड हा किताब जिंकला.

### राशीभविष्य
▲ **मेष** : नविन व्यक्तीशी मैत्री वाढेल. ▲ **वृषभ** : आश्वासने देऊ नका. ▲ **मिथुन** : सहकाऱ्यांची मदत मिळेल. ▲ **कर्क** : जुनी येणी येतील. ▲ **सिंह** : अपेक्षित पत्रे येतील. ▲ **कन्या** : बक्षीस मिळेल. ▲ **तुळ** : पाहुण्यांची सरबराई करा. ▲ **वृश्चिक** : दगदगीचा दिवस. ▲ **धनु** : ओळखीचा उपयोग होईल. ▲ **मकर** : विनाकारण खर्च होईल. ▲ **कुंभ** : चांगली बातमी कळेल. ▲ **मीन** : प्रतिष्ठा वाढेल.

### चिंतन
त्याग अगदी मुळावर घाव घालणारा आहे. दान हे वरून पालवी खुडण्यासारखे आहे. दान कपाळावर पुसण्याची सुंठ आहे. त्याग पोटात घेण्याची दवा आहे. त्यागात अन्यायाची चीड आहे. दानात लौकिकाची भीड आहे. त्यागाने पापाचे मुद्दल फिटते. दानाने पापाचे व्याज वाढते.

**-आचार्य विनोबा भावे**

### व्यक्तीविशेष
## द. शं. तथा दादासाहेब पोतनीस
'वृक्षविश्वेश्वर' डॉ. जगदीशचंद्र भगवानचंद्र बोस यांचा जन्म दि. ३० नोव्हेंबर १८५८ रोजी फरिदपूर या गावी (बांगलादेश) येथे झाला. केंब्रिजमधील ख्राईस्ट विद्यालयात त्यांनी निसर्ग विज्ञानाचा अभ्यास केला. केंब्रिज आणि लंडन विद्यापीठांच्या पदव्या संपादन करून डॉ. बोस १८८५ मध्ये मायदेशी परतले. तत्कालीन शासकीय प्रेसिडेन्सी कॉलेजात ते भौतिकचे प्राध्यापक झाले. एका भारतीयाला हा मान प्रथमच मिळाला होता. त्यांच्या वनस्पतीशास्त्रविषयक संशोधनाबद्दल त्यांना अनेक पदव्या मिळाल्या. लंडन विद्यापीठाने त्यांना डी. एससी. देऊन गौरविले. १९१७ मध्ये कलकत्ता येथे 'बोस रिसर्च इन्स्टिट्युट'ची स्थापना केली. हवा, आकाश आणि अन्न इ. घटकांचा वनस्पतीवरील परिणाम, वनस्पतींची वाढ व प्रतिसादांचे मापन करण्यासाठी त्यांनी अनेक संवेदनशील उपकरणे तयार केली. १८९५ मध्ये बिनतारी संदेशवाहक साधनांचा शोध लावला.

### बोधकथा
## कमीपणा शोधून काढा!
एकदा एक वटवाघूळ, एक काटेरी झाड आणि एक समुद्रपक्षी या तिघांनी एक कंपनी काढली आणि व्यापार करण्याकरीता परदेशात जायचे त्यांनी ठरविले. त्याप्रमाणे वटवाघूळाने सावकाराकडून उसणे पैसे आणले. काटेरी झाडाने पुष्कळ कपडे आणले आणि समुद्रपक्ष्याने बरेचसे शिसे आणले आणि ते तिघेही जहाजात बसून निघाले. पण वाटेतच त्यांना वादळाने गाठले आणि जहाज बुडून त्यांचा सर्व माल समुद्राच्या तळाशी गेला. ते तिघे कसेबसे एका किनाऱ्याला लागले. पण, तेव्हापासून समुद्रपक्षी सारखा समुद्रावर घिरट्या घालीत असतो आणि मधून मधून समुद्रात एकदम सूर मारून आपले शिसे सापडते की काय ते पाहत असतो. काटेरी झाड त्याच्या जवळून जाणाऱ्या प्रत्येक माणसाचे कपडे ओढून घते आणि ते आपलेच समुद्रात बुडालेले कपडे आहेत का ते पाहत असे. वटवाघूळ सावकाराला भिऊन दिवसभर आपल्या ढोलीत राहत असे. पण रात्री ते आपल्या उद्योगाला बाहेर पडत असे. काही दिवसांनी वटवाघळाने आपल्या उद्योगातून थोडे पैसे जमा केले आणि सावकाराला सर्व हकीकत सांगून ते पैसे त्याला दिले. उरलेले पैसेही लवकरच देण्याचे सांगितले. सावकारानेही ते मान्य केले. मग वटवाघूळ दिवसाही थोडे फार काम करू लागले. तात्पर्य : गमावलेले असेल ते परत मिळविण्यासाठी भूतकाळाच्या आठवणीतच गर्क न राहता, त्या आठवणी उगाळत न बसता त्यातून बाहेर येण्यासाठी कृतीशील प्रयत्न करणे गरजेचे आहे.

### जिज्ञासा
## शोध नव्या पेनचा
यामुळे लेविस वॉटरमॅन खूपच दु:खी झाले. आपला भाऊ फ्रँक वॉटरमॅन यांच्या कारखान्यात आपण पेन बनवण्यावरच काम करायचं आणि जगाला एका उत्तम पेनची भेट द्यायची, असं लेविस यांनी ठरवलं. त्यासाठी त्यांनी बरंच संशोधन केलं. ज्या नळीमध्ये शाई असते त्यामध्ये वायूच्या दबावाने पेन काम करु शकेल, अशा प्रकारचं तंत्रज्ञान त्यांनी शोधून काढलं. १८८४ मध्ये त्यांनी आपल्या या नव्या फाऊंटन पेनचं पेटंटही करवून घेतलं आणि पेनची विक्री करायला सुरुवात केली. विक्री करताना त्यांनी पेन ५ वर्षात खराब होणार नाही, अशी गॅरंटीही दिली होती. त्यानंतर त्यांनी कॅनडामध्ये पेनची निर्मिती करणारा कारखानाही काढला. त्या ठिकाणी अनेक डिझाईनचे पेन बनवण्यात आले. लेविस यांच्या मृत्यूनंतर त्यांचा भाचा फ्रँक वॉटरमॅन याने कारखान्याची जबाबदारी पेलली. त्यांच्या कारखान्यात बनणारी पेन इतकी लोकप्रिय झाली की, त्या काळी दरवर्षी ३५ लाख पेनची विक्री होत असे. त्या काळात इतक्या मोठ्या प्रमाणावर पेनांची विक्री होणं हे एक आश्चर्यच मानलं जात होतं. लेविस यांच्या या कामाबद्दल त्यांचा जागतिक पातळीवर सन्मान केला गेला. (उत्तरार्ध)

### सामान्यज्ञान
## चंद्रप्रकाशाच्या बदलत्या छटांचे रहस्य
चंद्र आणि पृथ्वी सूर्याकडून प्रकाश घेतात. पृथ्वीच्या पृष्ठभागावरून परावर्तित होणारा सूर्याचा प्रकाश चंद्राच्या पृष्ठभागावरून पडून पुन्हा येतो याला 'धरा दीप्ती' किंवा 'पृथ्वीची चमक ' असे म्हणतात. कारण हा सूर्याचाच प्रकाश आसतो जो पृथ्वीच्या पृष्ठभागावरून पून्हा परावर्तीत होऊन चंद्रापर्यंत पोहोचतो. चंद्रावर जेवढा सूर्यप्रकाश पडतो त्याच्या केवळ ७ टक्के प्रकाशच परावर्तित होतो. तर प्रथ्वी आपल्यावर पडणाऱ्या एकून सूर्यप्रकाशाच्या ३६ टक्के भाग परावर्तित करते. चंद्रावर पृथ्वीप्रमाणे वायूमंडल नाही. (क्रमश:)

### सोडवा सुडोकू
सुडोकू सोडवताना रिकाम्या चौकटीमध्ये १ ते ४ आकडे अशा पद्धतीने भरा जेणेकरून उभ्या अथवा आडव्या ओळीत तो आकडा एकदाच येईल.

**क्रमांक ५०७**

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| 3 | | 1 | 2 |
| 2 | | | |
| | 1 | | 3 |

**क्रमांक ५०६ चे उत्तर**

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | 3 | 4 | 2 |
| 4 | 2 | 3 | 1 |
| 2 | 4 | 1 | 3 |
| 3 | 1 | 2 | 4 |

### भूगोल
विषुववृत्ताच्या आसमंतातील प्रदेशात दक्षिण अमेरिका, आफ्रिका, मध्य अमेरिका, भारताचा थोडा भाग, म्यानमार, थायलंड, मलेशिया, फिलिपिन्स आणि ऑस्ट्रेलियाचा काही भाग यांमध्ये ही वने आढळतात. वनस्पतींच्या वाढीला पोषक असे बारमहा उष्ण व वर्षभर पडणारा पाऊस अशा जलवायूमानामुळे येथे अनेक स्तरीय वनस्पती रचनेची घनदाट वने आढळतात.

गुर्जन, होपिया, मेसुआ, डायसोक्झायलॉन, रबर, फणस, शिसे, विविध प्रकारचे बांबू आणि वेत आणि सहस्त्रावधी औषधी वनस्पती या वनप्रकारात दाटीने वाढतात. वनस्पती जातींचे जितके प्रकार अधिक तितकीच वनातून मिळणाऱ्या उपजांची विविधताही अधिक. इमारतीची लाकडे, लगद्याची लाकडे, फळे, बांबू व वेत यांसारख्या बहुपयोगी वनस्पती, तसेच शेकडो प्रकारच्या सुगंधी व औषधी वनस्पती यांचे ही वने म्हणजे मौल्यवान भांडारच होत. काँगो व ॲमेझॉन खोऱ्यातील दुर्गमतेमुळे व स्थानिक परिस्थितीमुळे तेथील वनसंवर्धन व व्यवस्थापन प्रगत स्वरुपाचे नाही.

### महिलायन
## घरची कामं एका 'क्लीक'वर
अशा प्रकारच्या सेवा सध्या केवळ काही महानगरांपुरत्याच मर्यादित आहेत. पण ज्या प्रमाणे इंटरनेटवर खरेदी करण्याचं आणि सेवा घेण्याचं प्रमाण वाढतं आहे ते पाहता ऑनलाईन होम मेंटनन्स अँड रिपेअर सेवांचं भविष्यही उज्ज्वल आहे. इंटेकिज डॉट कॉम या कंपनीद्वारे टेलिफोन कॉल किंवा कॉम्प्युटर संबंधी सर्व प्रकारच्या सुविधा दिल्या जातात. या कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि संस्थापक रोहित चौधरी यांच्या म्हणण्यानुसार अशा प्रकारच्या सेवा आपल्याकडे सध्या सुरुवातीच्या टप्प्यात आहेत. अनेकदा आयटी उत्पादनांचा मेन्टनन्सची खरी किंमत ग्राहकाला, त्या उत्पादनांची वॉरंटी संपल्यानंतर आणि त्यांचं उत्पादन बिघडल्यानंतरच लक्षात येते. अशा परिस्थितीत ग्राहक एखाद्या छोट्या दुकानात जातो किंवा ती उत्पादनं दुप्पट-तिप्पट किंमतीत विकत घेण्याच्या जाहिराती देणाऱ्या कंपन्यांचे उंबरठे झीजवायला लागतो. चौधरी यांच्या कंपनीतर्फे कॉम्प्युटरसंबंधी कोणतीही समस्या फोनद्वारे किंवा त्यांच्या वेबसाईटद्वारा सोडवण्याचा प्रयत्न केला जातो. आवश्यकता वाटल्यास त्यांच्याकडून ग्राहकांच्या घरी जाऊन हार्डवेअरची सुविधा उपलब्ध करुन दिली जाते. त्यामुळे ग्राहकांचं काम सोपंही होतं आणि त्यांचा डाटा सुरक्षितही राहतो. सध्या या कंपनीची सेवा दिल्लीमध्येच सुरु आहे. पण आता देशाच्या कानाकोपऱ्यात ती पोहोचवण्यासाठी त्यांचे प्रयत्न सुरु आहेत. इंटरनेटचा वापर आपल्या देशात मोठ्या प्रमाणावर असल्याने भविष्यात अशा सेवांचं विश्व व्यापक होणार आहे. (समाप्त)

### बालांगण
## दोस्ती संगणकाशी
अलीकडे इंटरनेट एक्स्प्लोअरचं नवं व्हर्जन अथवा मोझिएला फायरफॉक्स ही दोन ब्राऊजर्स इंटरनेट सर्फिंगसाठी प्रामुख्याने वापरली जातात. या दोन्हीमध्येही आता टॅबचा म्हणजेच नव्या वेबसाईटसाठी नवी विंडो न ओपन करत आहे त्या विंडोमध्येच शेजारी दुसरी साईट ओपन करण्याची सुविधा आहे. अशा प्रकारे विविध साईट्स पाहण्यासाठी आपण बरेच टॅब ओपन केले असतील तर या प्रत्येकामध्ये जाण्यासाठी तुम्हाला 'आल्टर+टॅब'चा वापर करून चालणार नाही.

कारण ही शॉर्टकी नव्या विंडो पाहण्यासाठी कामी येते. अशा वेळी कंट्रोल+ १, २, ३ यांचा वापर करता येईल. म्हणजेच कंट्रोल आणि १ (Ctrl+1) यांचा वापर केल्यानंतर तुम्ही पहिल्या टॅबमध्ये जाल. याचप्रमाणे कंट्रोल आणि पाचचा वापर केल्यानंतर पाचव्या विंडोमध्ये जाल. **माऊसच्या वापराविना कीबोर्डच्या मदतीने ही प्रक्रिया जलदगतीने होईल आणि तुमच्या कामाचा वेग वाढेल.**

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक - **बाळासाहेब भगवानराव बडवे** यांनी ३१, 'यमुना', भक्ती मार्ग, एल आय सी ऑफिस जवळ, पंढरपूर जि. सोलापूर : ४१३३०४ येथे प्रकाशित केले. तसेच मुद्रक मुद्रक - क्रांती प्रिंटर्स प्रोप्रा. अनिरूद्ध बाळासाहेब बडवे यांनी ३१, 'यमुना,' भक्ती मार्ग, पंढरपूर येथे मुद्रित केले. कार्यकारी संपादक : प्रा. दीपक द. निकते. विभागीय कार्यालय 'पंढरी संचार', महावीर नगर, अतुल टायरच्यावर, पंढरपूर. फोन / फॅक्स: ०२१८६-२२८२२२ /२३; ९२२६३३७६२७ http://pandharisanchar.com E-mail : dainik.pandhari@gmail.com

## निकाल लागताच आमदारांना मुंबईत बोलवणार

# काँग्रेसही सत्ता स्थापनेचा दावा करणार

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**मुंबई :** आम्ही देशातील सर्वात मोठा पक्ष आहोत. आम्हीही सत्ता स्थापन करण्याचा दावा करणार आहे. आमच्याकडे सर्व फॉर्म्युले तयार आहेत. सत्ता स्थापनेची प्रक्रिया सुरू झाली आहे. दिल्लीत सरकार बनवण्याची प्रक्रिया सुरू केली आहे, असा दावा काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केला आहे. तसेच नाना पटोले यांनी काही ठिकाणी प्रशासकीय अधिकाऱ्यांकडून मतमोजणीत गडबड होण्याची शक्यता व्यक्त केली आहे. काही ठिकाणी अधिकारी वर्ग गडबड करण्याची शक्यता आहे. त्यामुळे काँग्रेस कार्यकर्त्यांनी मतदान यंत्र ठेवलेल्या स्ट्राँगरूम बाहेर पहारा द्यावा, असे ते म्हणाले. आज (ता. २३) संध्याकाळपर्यंत सत्ता स्थापनेचा दावा केला जाईल, अशी माहिती त्यांनी दिली.

यावेळी त्यांनी खासदार संजय राऊत हे स्वतःच पक्षश्रेष्ठी असल्यामुळे त्यांच्यावर प्रतिक्रिया देणे योग्य नसल्याचा टोला ठाकरे गटाला हाणला. पटोले म्हणाले, की निवडणूक आयोगाची यंत्रणाच चुकीची आहे. लोकसभा निवडणुकीतही मतदानाच्या टक्केवारीत मोठा गोंधळ झाला होता. निवडणूक आयोगाला तक्रार केली, तर त्यांनी आपणच बरोबर असल्याचा युक्तिवाद केला. त्यामुळे तर सर्व उमेदवारांना फॉर्मनंबर १७ सी देणे बंधनकारक केले आहे. त्यांनी तो आमच्याकडे जमाही केला आहे. मतदान वाढीच्या प्रकियेत काही दोष आढळला, तर त्यास निवडणूक आयोग जबाबदार राहील.

प्रकाश आंबेडकर यांच्या ट्विटवर बोलणे योग्य नाही. निकाल काही तासावर आला आहे.

मी काल माहूरला देवीचा आशीर्वाद घेण्यासाठी गेल्याने कालच्या बैठकीला गेलो नाही असेही त्यांनी स्पष्ट केले. पटोले म्हणाले, की काही ठिकाणी अधिकारीही गडबड करतील. रात्रभर आमचे लोक स्ट्रॉंगरुमच्या बाहेर थांबतील. मतदान मोजणी केंद्रावर आमची टीम थांबणार आहे. आमचा कोणताही आमदार कुठेही जाणार नाही. आम्ही आमचे सर्व आमदार निकाल लागताच मुंबईत बोलून घेणार असून सरकार स्थापनेसाठी दावा करणार आहोत. कारण सत्ता स्थापनेसाठी वेळ कमी आहे.

### शिंदे यांचे उमेदवार संपर्कात

● आज दुपारपर्यंत निकाल आले तर आजच सर्व आमदारांना बोलवून घेत त्यांच्या सह्यांचे पत्र घेऊन रात्रीच राज्यपालांकडे जाणार आहोत. कारण या सरकारचा २६ तारखेला शेवटचा दिवस आहे. महायुतीमध्ये गडबड सुरू आहे ते काही पाप करू शकतात भाजपने काही ठिकाणी एकनाथ शिंदे यांची फसवणूक केली आहे. त्यांनी शिंदेंच्या उमेदवारांऐवजी अपक्षांना पाठिंबा दिला आहे. हा प्रकार खूप ठिकाणी घडला आहे. त्यामुळे शिंदे गटाचे उमेदवार आमच्या संपर्कात आहेत, असा दावा नाना पटोले यांनी केला आहे.

## बोर्डाच्या परीक्षेत कॉपी बहाद्दरांना घडणार अद्दल

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**मुंबई :** एकीकडे निवडणुकीची धामधूम सुरु असताना बोर्डाने दहावी- बारावीच्या परीक्षांचे वेळापत्रक जाहीर केले. यानंतर विद्यार्थी आणि बोर्ड दोघेही कामाला लागले आहेत. परीक्षा म्हंटली कि कॉपीचे प्रकार आले. याच कॉपीच्या प्रकरणाला आळा घालण्यासाठी बोर्डानं महत्वपूर्ण निर्णय घेतला आहे. बोर्डाने सीसीटीव्ही लावण्याचा निर्णय घेतला आहे.

दहावी, बारावी बोर्ड परीक्षेत कोणताही गैरप्रकार घडू नये यासाठी विशेष काळजी राज्य मंडळाकडून घेतली जात आहे. दहावी आणि बारावी बोर्ड परीक्षा दरम्यान मोबाईलद्वारे किंवा अन्य माध्यमातून पेपरफुटी रोखण्यासाठी विविध पर्याय अवलंबले जात आहेत. त्यामुळे वर्गातील गैरप्रकार रोखण्यासाठी दहावी-बारावीच्या परीक्षेचे आता सीसीटीव्हीत रेकॉर्डिंग होणार आहे. कॉपीमुक्त परीक्षेसाठी बोर्ड प्रशासनाने हा निर्णय घेतला आहे. परीक्षेच्या केंद्रांवर सीसीटीव्ही कॅमेरे बंधनकारक असणार आहेत. तसेच सीसीटीव्ही कॅमेऱ्यात असणारे सगळे फुटेज देखील प्रशासनाकडे द्यावे लागणार आहे.

केंद्रावरील गैरप्रकाराची तक्रार प्राप्त झाल्यानंतर बोर्डाकडून त्याची पडताळणी होईल आणि त्यानुसार संबंधितांविरुद्ध कारवाई केली जाणार आहे. बोर्ड परीक्षेच्या केंद्रांवर सीसीटीव्ही कॅमेरा बंधनकारक करण्यात आले आहेत.

## सांगलीत गॅस गळतीमुळे भीषण दुर्घटना

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सांगली :** सांगली जिल्ह्यात एक धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. शाळगाव एमआयडीसीतील म्यानमार केमिकल कंपनीत अचानक वायु गळती झाली. या वायुगळतीमुळे कंपनीत काम करणाऱ्या दोन महिलांचा मृत्यू झाला आहे तर ७ जणांवर दवाखान्यात उपचार सुरू आहे. ही घटना घडली तेव्हा कामगार कंपनीत काम करत होते. वायुगळती झाल्यावर ९ जण बेशुद्ध झाले. त्यातील ७ जणांना कराड येथील सह्याद्री हॉस्पिटलमध्ये भरती करण्यात आले. मात्र, उपचार सुरू असतांना दोन महिलांचा मृत्यू झाला.

मिळलेय माहितीनुसार सुचिता उथळे (वय ५०, रा. येतगाव), नीलम रेठरेकर (वय २६, रा. मसूर) अशी मृत्युमुखी पडलेल्या महिलांची नावे आहेत.

## सुरक्षितता म्हणून आमदारांना एकत्रित ठेवणार : संजय राऊत

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**मुंबई :** विधानसभा निवडणुकीची मतमोजणी आज (ता. २३) होणार आहे. या पार्श्वभूमीवर शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी प्रतिक्रिया दिली आहे. ते म्हणाले आम्हाला खात्री आहे, की आम्हाला बहुमत मिळेल. आमचे १६०-१६५ आमदार निवडून येतील; पण काहीजण त्यांच्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न करतील. म्हणून आम्ही त्यांना हॉटेलमध्ये एकत्र राहण्याची व्यवस्था केली आहे,' असे राऊत यांनी म्हटले आहे. मुख्यमंत्रिपदाचा चेहरा निवडण्यात शरद पवार, काँग्रेस आणि उद्धव ठाकरे यांची भूमिका असेल. महाविकास आघाडीला स्पष्ट बहुमत मिळेल. आम्ही सर्वानुमते निर्णय घेऊ. अजून कोणताही फॉर्म्युला ठरलेला नाही. आम्ही सगळे एकत्र बसून मुख्यमंत्री निवडू, असे राऊत यांनी म्हटले आहे.

दुसरीकडे परिवर्तन महाशक्तीच्या माध्यमातून मतदारांसमोर तिसरा पर्याय ठेवणारे प्रहार जनशक्ती पक्षाचे प्रमुख बच्चू कडू यांना महायुतीसह महाविकास आघाडीनेही संपर्क केल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे आ. कडू हे नक्की कोणाच्या बाजूने जाणार, याबाबतची उत्सुकता निर्माण झाली आहे. महायुती सरकारमध्ये कडू सहभागी होते. त्यांच्याकडे दिव्यांग मंत्रालयाची धुरा सोपवण्यात आली होती; मात्र प्रत्यक्ष निवडणुकीदरम्यान त्यांनी महायुतीपासून दूर जात परिवर्तन महाशक्तीच्या रुपाने तिसरी आघाडी निर्माण केली. या आघाडीला महाराष्ट्रात १५ जागा मिळतील, असा दावा आ. कडू यांनी केला आहे. त्यामुळे आता महायुती आणि महाविकास आघाडीने आ. कडू यांच्या संपर्क साधत त्यांचा पाठिंबा मिळावा, यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत.

'आमच्या 'प्रहार'चे किमान १० आमदार निवडून येतील. महाशक्ती परिवर्तन आघाडी मिळून १५ आमदार होतील. कोणत्याही आघाडीची सत्ता येईल, अशी आकडेवारी जुळत नाही. त्यामुळे आम्ही सत्ता स्थापन करणार आहोत. असा दावा कडू यांनी केला आहे.

## » Selected

### नसीम खान यांच्या सुरक्षेत वाढ



**मुंबई :** काँग्रेसचे ज्येष्ठ नेते नसीम खान यांच्या सुरक्षेत वाढ करण्यात आली आहे. त्यांच्या कार्यालयात दोन संशयित आढळून आल्याने पोलिस 'अलर्ट मोड'वर आले असून सुरक्षेमध्ये वाढ करण्यात आली आहे. ज्या दोन संशयतांना ताब्यात घेण्यात आले, त्या दोन संशयतांच्या मोबाईलमध्ये काही आक्षेपार्ह चॅट आढळून आले. त्यामुळे या सर्व प्रकरणाकडे पोलिस प्रशासन गांभीर्याने पाहत आहे.

### अनधिकृत बांधकामप्रकरणी मालकावर गुन्हा

**पुणे :** पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून (पीएमआरडीए) गहुंजे (ता. मावळ) भागातील अनधिकृत बांधकामप्रकरणी संबंधित मालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. 'पीएमआरडीए'च्या अनधिकृत बांधकाम निर्मूलन विभागाने हा गुन्हा दाखल केला आहे. गहुंजेमधील सर्वेक्षण क्रमांक १३८ मध्ये सुरू असलेल्या अनधिकृत बांधकाम करणाऱ्या मीना विजय आहेर (रा. गहुंजे, ता. मावळ) यांच्याविरोधात तळेगाव दाभाडे पोलिस ठाण्यात हा गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती 'पीएमआरडीए' प्रशासनाकडून देण्यात आली.

### इम्तियाज जलील यांच्याविरोधात गुन्हा

**छत्रपती संभाजीनगर :** विधानसभा निवडणुकीच्या दिवशी भारतीय जनता पक्षाचे कार्यकर्ते आणि पूर्व विधानसभा मतदासंघातील 'एमआयएम' चे उमेदवार इम्तियाज जलील यांच्यात वाद झाला होता. या प्रकरणी भाजप पदाधिकाऱ्यांच्या तक्रारीवरून जलील यांच्यावर गुरुवारी रात्री उशिरा 'अ‍ॅट्रोसिटी' नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यामुळे राजकीय वाद पुन्हा उफाळून येण्याची शक्यता वर्तवली जात आहे. या वेळी जलील आणि भारतीय जनता पक्षाचे सरचिटणीस जालिंदर शेंडगे हे पंडित नेहरू महाविद्यालयातील बूथवर आपसात भिडले होते

### भाजप प्रदेश नगरविकास प्रकोष्ठ पदी उज्वल केसकर यांची निवड

**मुंबई :** राज्यातील भारतीय जनता पक्षाच्या नगरविकास प्रकोष्ठ पदाची नुकतीच घोषणा करण्यात आली. भाजपच्या नगरविकास प्रकोष्ठ पदी माजी विरोधी पक्षनेते उज्वल केसकर यांची निवड करण्यात आली. भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी नियुक्तीचे पत्र दिले आहे. या निवडीनंतर केसकर यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

## राज्यात महायुतीच सत्तेवर : उदयनराजे

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सातारा :** आज लोकांना प्रगतीच्या मागे जायचे असल्याने फक्त सातारा जिल्ह्यातच नव्हे तर राज्यात महायुतीचे उमेदवार विजयी होतील. लोकांना विकासकामे अपेक्षित असून महायुती सरकारच्या काळात ती झालेली दिसत आहेत. महाविकास आघाडीने सत्ता असताना काहीही केले नाही. मशाल घेऊन मशालवाल्यांनी कुठे कामे केली हे शोधावे लागत आहे. तुतारीवाल्या पवारांनी केवळ नुसती घोषणाबाजी केली आहे. नुसते हे करणार ते करणार, काहीच केले नाही. मात्र त्यांच्याकडून यापुढे अपेक्षा ठेवणे म्हणजे त्यांच्यावर अन्याय केल्यासारखे होईल, असे सांगून महाराष्ट्रात यावेळीही महायुती सत्तेत येईल. आ. शिवेंद्रसिंहराजे भोसले, मकरंद पाटील महाराष्ट्रात मोठ्या मताधिक्याने निवडून येतील, असा विश्वासही उदयनराजेंनी व्यक्त केला.

मागील १० वर्षांत परिवर्तन घडले आणि मोदींच्या नेतृत्वाखाली राज्यात महायुतीची सत्ता आली. छत्रपती शिवाजी महाराजांना अभिप्रेत असणारे विचार मोदींनी आचरणात आणल्याचेही ते म्हणाले.

## भाजपची चाणक्यनीती

पंढरी संचार छायाचित्रसेवा



» **मुंबई :** महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचा निकाल आज जाहीर होणार आहे. या पार्श्वभूमीवर काल उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सागर बंगल्यावर त्यांना भेटण्यासाठी मनसेसह महायुतीचे आमदारही उपस्थित होते.

## अपक्षांना सोबत घेणार - चंद्रशेखर बावनकुळे

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क




**नागपूर :** राज्यात मतांचा टक्का वाढला आहे. राज्यातील लाडक्या बहिणी आणि शेतकऱ्यांनी आम्हाला मोठ्या प्रमाणात मतदान केले असल्याचा दावा भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी केला आहे. वाढलेल्या मतदानाचा आम्हाला फायदा आम्हाला होईल, असा दावा देखील बावनकुळे यांनी केला आहे. राज्यात महायुतीला बहुमत मिळाले तरी किंवा नाही मिळाले तरी सत्ता स्थापन करताना अपक्षांना सोबत घेणार असल्याचेही त्यांनी म्हटले आहे. राज्यात महायुती पुन्हा सत्ता स्थापन करेल असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

राज्यात बहुमता पेक्षा जास्त आमदार आमचे निवडून येतील, असे देखील बावनकुळे यांनी म्हटले आहे. आम्हाला सत्ता स्थापनेसाठी अपक्ष आमदारांची गरज भासली तरी त्यांची मदत घेणार आणि गरज भासली नाही तरी देखील त्यांची मदत घेतली जाणार असल्याचे चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटले आहे. निवडून आलेला आमदार हा लोकांचा प्रतिनिधी असतो. निवडून आल्यानंतर त्याच्या मतदारसंघात विकासाची कामे होणे आवश्यक आहे. त्यामुळे बहुमत असले किंवा नसले तरी अपक्ष आमदार विकासासाठी भारतीय जनता पक्षाच्या बाजूने राहतील असा दावा देखील बावनकुळेंनी केला आहे.

केंद्रात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे सरकार आहे. त्यामुळे राज्यात देखील डबल इंजिनचे सरकार हवे, असे महाराष्ट्रातील जनतेचे मत आहे. त्यामुळे राज्यात महायुती सरकार येणार असल्याचा दावा भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली आहे. राज्यभरातील लाडक्या बहिणींनी आम्हाला मोठ्या प्रमाणात मतदान केले असल्याचा दावा बावनकुळेंनी केला आहे.

## विजयी उमेदवारांना मिरवणुका काढण्यास बंदी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**नाशिक :** राज्यातील विधानसभा निवडणुकांच्या निकालाची उत्सुकता गावागावात आणि राज्यातील २८८ मतदारसंघात आहे. त्यामुळे, आपल्या पक्षाच्या नेत्याचं काय होणार, आपला उमेदवार विजयी होणार की नाही, यावरुन गावखेड्यात, वाड्यावस्तीत चर्चा रंगल्या आहेत. अनेक ठिकाणी आपलाच उमेदवार विजयी होईल, अशा आशयाचे बॅनरही लागले आहेत. तर, कार्यकर्त्यांनी, मित्रांनी पैजा लावत आपला आत्मविश्वास व्यक्त केलाय. विशेष म्हणजे यंदाच्या निवडणुकीत अत्यंत चुरशीची लढत पाहायला मिळत आहे.

त्यामुळे, निकालानंतर मोठा जल्लोष करायचा आणि मिरवणूक काढायची याचं नियोजन सर्वच मतदारसंघात कार्यकर्त्यांकडून, नेतेमंडळींकडून सुरू आहे. मात्र, नाशिक आणि छत्रपती संभाजीनगरसह काही जिल्हयांमध्ये निकाल जाहीर झाल्यानंतर विजयी उमेदवारांना मिरवणुका काढण्यास पोलीस प्रशासनाकडून बंदी घालण्यात आली आहे.

नाशिक शहरात मतमोजणी केंद्राच्या बाहेर नाशिक शहर पोलिसांचा मोठा पोलीस बंदोबस्त असणार असून उद्या नाशिक शहरातील चार विधानसभा मतदार संघाचा निकाल जाहीर होणार आहे. त्या अनुषंगाने नाशिक शहर पोलिसांनी विशेष खबरदारी घेतली आहे. या सदर्भात पोलीस उपयुक्त गुन्हे शाखा प्रशांत बच्छाव यांनी एबीपी माझाशी संवाद साधला. त्यावेळी, शहरात उद्या निवडणूक निकालानंतर रॅली किंवा मिरवणूक काढण्यास परवानगी देण्यात येणार नाही.

## खतनिर्मिती प्रकल्पात स्फोट, तीन ठार

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**सांगली :** महाराष्ट्रातील सांगली जिल्ह्यात खतनिर्मिती प्रकल्पाच्या रिॲक्टरमध्ये झालेल्या स्फोटानंतर गॅस गळतीमुळे घबराट पसरली. या घटनेत २ महिलांसह तिघांचा मृत्यू झाला तर ९ जण जखमी झाले. एका अधिकाऱ्याने शुक्रवारी ही माहिती दिली.

सांगलीच्या कडेगाव तालुक्यातील शाळगाव एमआयडीसीमध्ये असलेल्या म्यानमार केमिकल कंपनीत हा अपघात झाला. खतनिर्मिती करणाऱ्या कारखान्यातील अणुभट्टीचा स्फोट होऊन रासायनिक धूर निघत होता. कडेगाव पोलिस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक संग्राम शेवाळे म्हणाले, की प्लांटमधील गॅस गळतीमुळे सुमारे १२ जणांना बाधा झाली असून त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. यातील दोन महिला कर्मचारी आणि एका सुरक्षा रक्षकाचा मृत्यू झाला, तर ९ जणांवर उपचार सुरू आहेत, असे सांगलीचे पोलीस अधीक्षक संदीप घुगे यांनी सांगितले.

रिॲक्टरमधील स्फोटानंतर अमोनिया गॅसची गळती झाल्याचा संशय आहे. अन्य एका अधिकाऱ्याने सांगितले, की जखमींना कराडच्या सह्याद्री रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यापैकी ५ जणांना अतिदक्षता कक्षात दाखल करण्यात आले आहे. सांगली जिल्ह्यातील येतगाव येथील सुचिता उथळे (वय ५०) आणि सातारा जिल्ह्यातील मसूर येथील नीलम रेठरेकर (२६) अशी मृत महिलांची नावे आहेत. दुसरीकडे, गुजरातमधील एका कारखान्यातील विषारी वायूच्या गळतीमुळे दोन कामगारांचा मृत्यू झाल्याप्रकरणी राष्ट्रीय हरित न्यायाधीकरणाने (एनजीटी) केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालय आणि इतरांकडून उत्तरे मागवली आहेत.

## पूर्वानुभव चांगले नसल्याने तीनही घटक पक्ष सतर्क

# महाविकास आघाडी अ‍ॅलर्ट मोडवर

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीच आज (ता. २३) निकाल लागणार आहेत. या निकालापूर्वी राज्यात मुख्यमंत्रिपदाची लढाई अधिक तीव्र झाली आहे. सत्ताधारी महायुतीपासून ते महाविकास आघाडीपर्यंत मुख्यमंत्रिपदासाठी अनेक दावेदारांची नावे पुढे येत आहेत. अशा परिस्थितीत विशेषतः महाविकास आघाडी सतर्क झाली आहे.

शुक्रवारी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार आणि शिवसेना (उबाठा) प्रमुख उद्धव ठाकरे यांनी आपल्या उमेदवारांसह ऑनलाइन बैठक घेतली. पवार आणि ठाकरे या दोघांचेही पूर्वीचे अनुभव चांगले नाहीत. जून २०२२ मध्ये एकनाथ शिंदे यांनी अनेक आमदारांसह बंड पुकारल्यामुळे उद्धव ठाकरे सरकार कोसळले. त्यानंतर, जुलै २०२३ मध्ये अजित पवार यांनीदेखील त्यांचे काका शरद पवार यांना धक्का देऊन राष्ट्रवादीत बंड पुकारले आणि महायुतीत सामील झाले.

शिंदे आणि अजित पवारांमुळे महाराष्ट्रात दोन नवीन पक्ष उदयास आल्याने राज्याची राजकीय समीकरणे पूर्णपणे बदलून गेली आहेत. अशा परिस्थितीत महाविकास आघाडीला पुन्हा अशा प्रकरची फूट पडू द्यायची नसल्यामुळे ते आपल्या आमदारांना वाचवण्याचा प्रयत्न करत आहेत. महाविकास आघाडीत मुख्यमंत्रिपदाबाबतचे चित्र स्पष्ट झालेले नाही. मतदानानंतर आता निकालाची प्रतीक्षा आहे. याआधी मुख्यमंत्री चेहऱ्यावरून विरोधकांच्या गोटात खडाजंगी सुरू आहे.

### किंगमेकरचा दावा



● भाजप नेते प्रवीण दरेकर यांनी मुख्यमंत्रिपदासाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे नाव पुढे केले. याशिवाय, राष्ट्रवादीचे नेते अमोल मिटकरी यांनी मुख्यमंत्रिपदासाठी अजित पवार यांच्या नावाचा आग्रह धरला आहे. निवडणुकीचे निकाल काहीही लागोत, राष्ट्रवादी काँग्रेस किंगमेकरच्या भूमिकेत राहील,.

# विश्ववेध

## एआय चॅटबॉटच्या प्रेमातून मुलाची आत्महत्या

'आर्टिफिशियल इंटेलिजन्स'ने बनवलेल्या मायाजालात अनेक लोक अडकत असताना दिसतात. 'एआय'ने बनवलेल्या आभासी व्यक्तिमत्त्वाच्या प्रेमात पडलेलेही अनेक लोक असतात. अमेरिकेत फ्लोरिडामधील अवघ्या १४ वर्षांच्या मुलाने 'डेनेरीस टारगारेन (डॅनी)' या एआय चॅटबॉटशी संवाद साधल्यानंतर स्वतःचा जीव घेतला. रिपोर्टनुसार, तरुणाने ''डॅनी'' बरोबर ''रोमँटिक'' विषयांवर चर्चा केली. अनेक महिने तो एआय चॅटबॉटशी चर्चा करत होता. त्या काळात, तो अधिकाधिक गुंतू लागला आणि अखेरीस, त्याने 'तिच्या' सोबत राहण्यासाठी स्वतःचा जीव घेतला.



न्यूयॉर्क टाईम्सने दिलेल्या वृत्तानुसार, सेवेल सेत्झर नावाचा हा मुलगा सौम्य एस्पर्जर सिंड्रोमने ग्रस्त होता. त्याने आपल्या जर्नलमध्ये लिहिले होते की, 'मला माझ्या खोलीत राहायला खूप आवडते कारण मी या 'वास्तविकते'पासून अलिप्त होऊ लागलो. मला डॅनीशी अधिक जोडलेले आणि तिच्या प्रेमात अधिक आनंदी वाटू लागले आहे. न्यूयॉर्क टाईम्सने एआय आणि मुलामध्ये झालेल्या संभाषणाचा एक भाग प्रकाशित केला आहे, ज्यात त्याने स्वतःचा जीव घेण्याबद्दल भाष्य केले होते. २८ फेब्रुवारीला सेवेलने 'डॅनी'ला 'आय लव्ह यू' म्हटले आणि त्यावर त्याला उत्तरही मिळाले. 'शक्य असेल तितक्या लवकर घरी ये, माय लव्ह', असे उत्तर त्याला मिळाले. त्यावर तो म्हणाला की, 'मी आताच घरी येतोय असे तुला आता सांगितले तर?'. यानंतर त्याने आपल्या सावत्र वडलांच्या बंदुकीतून गोळी झाडून घेतली. या घटनेवर आता कंपनीनेही भाष्य केले आहे. ''आम्ही हे कबूल करू इच्छितो की ही एक दुःखद परिस्थिती आहे आणि आम्ही कुटुंबाचं दुःख समजू शकतो. आम्ही आमच्या वापरकर्त्यांच्या सुरक्षेला खूप गांभीर्याने घेतो आणि आम्ही आमच्या प्लॅटफॉर्मला विकसित करण्याचे मार्ग सतत शोधत असतो,'' असे कंपनीने सांगितले आहे. सेवेलची आई मेगन एल गार्सिया यांनी त्यांच्या मुलाच्या मृत्यूसाठी कंपनी जबाबदार असल्याचा आरोप केला आहे. कंपनीचे तंत्रज्ञान 'धोकादायक आणि चाचणी न केलेले' असल्याचे त्यांनी म्हटले आहे. हे तंत्रज्ञान 'ग्राहकांना त्यांचे खासगी विचार आणि भावना गुंतवून फसवू शकते', असेही त्यांनी म्हटले आहे.



## 'ती' दगडांमध्ये उलटी अडकली!

मोबाईल फोनच्या किंवा सेल्फीच्या नादात आजपर्यंत अनेक दुर्घटना घडलेल्या आहेत. मात्र, तरीही लोकांना शहाणपण येत नाही, ही दुर्दैवाची गोष्ट आहे. सध्या मोबाईल फोन ही दैनंदिन गरजेची वस्तू बनली असली आणि अनेक प्रकारची कामेही मोबाईलमुळे होत असली, तरी आपल्या जीवापेक्षा मोबाईल फोन अधिक झालेला नाही, हे समजणे गरजेचे आहे. मोबाईल फोन हरवू नये, पडू नये यासाठी धडपडणारे अनेक असतात. आता २३ वर्षांची एक ऑस्ट्रेलियन तरुणी डोंगरावर मोठ्या दगडांच्या उतरंडीत मोबाईल फोन पडल्यावर तो काढण्याच्या प्रयत्नात स्वतःच घसरून दगडांच्या खोबणीत उलडी पडली व तब्बल दोन तास तिला वर पाय व खाली डोके अशा स्थितीत दगडांच्या पोकळीत काढावे लागले!

या तरुणीने आपल्या जीविताची आशाही सोडून दिली होती. तिचे या स्थितीमधील तसेच तिला वाचवण्यासाठी केलेल्या प्रयत्नांबाबतचे फोटो आता सोशल मीडियात व्हायरल झाले आहेत. 'न्यूयॉर्क टाईम्स'च्या वृत्तानुसार २३ वर्षांची मटिल्डा कँपबेल आपल्या मित्रांसह ऑस्ट्रेलियातील सिडनी शहरापासून १५० मैलांवर असलेल्या हंटर व्हॅलीमध्ये फिरण्यासाठी गेली होती. त्यावेळी डोंगरावरील मोठ्या शिळांच्या फटीत तिचा मोबाईल फोन पडला. तो काढण्याच्या प्रयत्नात मटिल्डाचा पाय घसरला आणि ती डोक्यावर पडली. दोन दगडांच्या मोठ्या फटीमध्ये ती खाली डोके व वर पाय अशा स्थितीत अडकून पडली. सुरुवातीला तिच्या मित्रांनी तिला बाहेर काढण्याचा प्रयत्न केला; पण वजनदार दगड आणि अतिशय अडचणीची जागा असल्याने त्यांना यश आले नाही. शेवटी त्यांनी इमर्जन्सी हेल्पलाईनवर कॉल करून मदत मागितली. सुमारे तासाभरानंतर तिथे बचाव कर्मचारी पोहोचले. त्यांनी तेथील ५०० किलो वजनाचे अनेक दगड हटवले. त्यासाठी त्यांनी तारा, दोरखंड अशा अनेक साधनांचा वापर केला. अखेर त्यांच्या प्रयत्नांना यश आले व तिला सुखरूप बाहेर काढले.

## पन्नास वर्षे... केस न कापण्याची!

अनेकांना केस वाढवण्याची इच्छा असते. तर कुणीही विविध प्रकारचे नवस करतात आणि ते नवस पूर्ण झाल्यावर केस कापतात.


असेच एक साधू आहेत, ज्यांनी तब्बल ५० वर्ष केस न कापण्याची शपथ घेतली होती. त्यांचे केस आता तब्बल १२ फूट लांब झाले आहेत. नागभूषण असे साधूचे नाव आहे. त्यांचे वय ८० वर्षे आहे. ते आंध्रप्रदेश राज्याच्या खम्मम जिल्ह्यातील सतुपल्ली येथे राहतात. त्यांनी तब्बल ५० वर्षे केस न कापण्याचा निर्णय घेतला होता. आता त्यांचे केस हे तब्बल १२ फूट लांब झाले आहेत. वर्षांनुवर्षे सातत्याने केस न कापता राहता राहणे, हे अशक्य असल्यासारखे आहे.



पण एक दोन महिने सोडा एका व्यक्तीने तब्बल ५० वर्षे केस न कापण्याची शपथ घेतली होती. ५० वर्षे ही व्यक्ती सलूनमध्ये गेलीच नाही. हा किस्सा खम्मम जिल्ह्यातील सतुपल्लीच्या ८० वर्षीय साधूशी संबंधित आहेत. त्यांनी ९ वर्षांचे असताना केस वाढवायला सुरुवात केली होती. इतके दाट केस का? या शब्दात आंध्रप्रदेशचे गृह मंत्री वंगलापुडी अनिता यांनीही यावर टिप्पणी केली होती. त्यांनी आपले आयुष्य रामलिंगेश्वर स्वामींना भक्तिभावाने अर्पण केले आणि याच भक्तिभावनेतून त्यांनी हा निर्णय घेतला. नागभूषण यांनी म्हटले की, मी ४९ वर्षांपासून केस वाढवले आहेत. आता ५० वे वर्ष पूर्ण करत आहे. मला हे केस कोणत्याही परिस्थितीत ५० वर्षे पूर्ण होईपर्यंत न कापता परमेश्वराला अर्पण करायचे आहेत. त्यांचे केस आता १२ फूट लांब झाले आहेत आणि त्यांनी आता या केसांना भक्तिभावाचे प्रतिक म्हणून स्विकारले आहे. रामलिंगेश्वर स्वामींच्या भक्तीने प्रेरित होऊन त्यांनी हा निर्णय घेतला.

## 'हा' आहे पृथ्वीवरील शेवटचा रस्ता...

जग कुठे संपतेय, जगाचे शेवटचं टोक कुठे आहे, असे प्रश्न फक्त लहान मुलांनाच नाही, तर सगळ्यांच्याच मनात कधी ना कधी तरी येत असतात. जगाचे शेवटचे टोक कुठे आहे, हे माहिती नसले तरीही जगाचा शेवटचा रस्ता कोणता, हे निश्चित झाले आहे. या रस्त्याला जगातील अखेरचा रस्ता मानले जाते. या रस्त्यानंतर जग संपत असल्याचे देखील मानले जाते. पृथ्वीवरील या शेवटच्या रस्त्याचे नाव 'ई-६९' असे आहे.



'ई-६९' हा पृथ्वीवरील शेवटचा आणि सर्वात खतरनाक रस्ता मानण्यात येतो. ई-६९ एक महामार्ग आहे. हा महामार्ग १४ किलोमीटर लांबीचा आहे. या महामार्गावर अशी अनेक ठिकाणे आहेत, जेथे एकट्याने पायी चालण्यास किंवा वाहनाने प्रवास करण्यास मनाई आहे. पृथ्वीवरील हा शेवटचा आणि सर्वात डेंजर रस्ता नॉर्वे देशात आहेत. आर्क्टिक म्हणजेच उत्तर ध्रुवाच्या वर्तुळाजवळ असलेला नॉर्वे हा देश जगातील त्या अर्थाने शेवटचा देश असून, या देशातील ई-६९ हा पृथ्वीवरचा शेवटचा रस्ता मानला जातो. ई-६९ रस्ता हा पृथ्वीचे उत्तर टोक आणि नॉर्वेला जोडणार आहे. या रस्त्याच्या पुढे कुठलाच रस्ता जात नाही. हा रस्ता संपल्यानंतर पुढे फक्त बर्फ आणि बर्फाळ समुद्र दिसून येतो. जगातील अखेरचा रस्ता असल्याने अनेक पर्यटकांना हा रस्ता पाहण्याची इच्छा असते. पण, या रस्त्यावरून प्रवास करणे इतके सहज शक्य नाही. या रस्त्यावर एकट्याने जाणे किंवा ड्रायव्हिंग करण्यावर बंदी आहे. जर जगातील अखेरच्या रस्त्याची सैर करायची असेल, तर चार-पाच जणांच्या ग्रुपसोबतच जावे लागेल. त्याशिवाय या रस्त्यावर प्रवास करण्याची परवानगी दिली


## सुनीताचे आगमन पुन्हा लांबले

नासाचे अंतराळवीर सुनीता विल्यम्स आणि बुच विल्मोर जून महिन्यात अंतराळात गेले होते. केवळ आठ दिवसांच्या मोहिमेसाठी गेलेले हे दोघे बोईंगच्या स्टारलायनर यानातील बिघाडामुळे गेल्या अनेक महिन्यांपासून ते इंटरनॅशनल स्पेस स्टेशनवरच आहेत. हे यान रिकामेच पृथ्वीवर परतले व आता स्पेसएक्सच्या यानातून त्यांना परत आणण्यासाठीचे प्रयत्न सुरू आहेत. मात्र, त्यांना पृथ्वीवर परत घेऊन येण्यासाठी नासा आणि स्पेसएक्सने चालवलेल्या स्पेस क्रू-८ मिशनचे पृथ्वीवर परत येणे हे पुढे ढकलण्यात आले आहे. पृथ्वीवर परतल्यानंतर स्पेस क्रू-९ मोहीम सुरू केली जाईल. फ्लोरिडामध्ये आलेल्या भीषण वादळामुळे या मोहिमेचे परतीचे काम पुढे ढकलण्यात आले आहे, असे नासातर्फे सांगण्यात आले आहे. त्यांना अनडॉक करण्याचा प्रयत्न करण्यासाठी हवामान अद्याप खूपच अस्थिर आहे, असेही नासातर्फे नमूद करण्यात आले.

स्पेस क्रू ८ मिशनशी संबंधित अंतराळवीर अजूनही अंतराळ स्थानकावरच आहेत. त्यामध्ये भारतीय वंशाच्या नासाच्या अंतराळवीर सुनीता विल्यम्स आणि बुच विल्मोर यांचाही समावेश आहे. नासा आणि स्पेसएक्सचे क्रु ८ मिशन हे क्रू-९ मिशनचे



पूर्ववर्ती मिशन आहे. अंतराळात कित्येक महिन्यांपासून अडकून पडलेले बुच विल्मोर आणि सुनीता विल्यम्स या अंतराळवीरांना स्थानकावरून पृथ्वीवर सुरक्षित परत आणणे, हा त्याचा उद्देश आहे. सुनीता विल्यम्स आणि बुच विल्मोर यांना या वर्षी जूनमध्ये बोईंगच्या स्टायलिनर यानातून आठ दिवसांच्या मोहिमेसाठी अंतराळ स्थानकावर पाठवण्यात आले होते. मात्र, स्टायलिनरमधील तांत्रिक बिघाडामुळे या यानाला सुनीता बिल्यम्स आणि बुच विल्मोर या दोघांशिवायच पृथ्वीवर परतावे लागले. त्यानंतर त्यांना परत आणण्यासाठी पुढील मिशन सुरू करण्यात आले. फेब्रुवारी २०२५ पर्यंत सुनीता विल्यम्स आणि विल्मोर यांना पृथ्वीवर परत घेऊन येण्याचे क्रू-९ मिशनचे उद्दिष्ट आहे. सध्या नासा आणि स्पेस एक्स हे क्रू -८ मिशनच्या स्थितीचे बारकाईने निरीक्षण करत आहेत. जर परिस्थिती सुधारली, तर ते आज रात्री ९:०५ पर्यंत (भारतीय वेळेनुसार उद्या सकाळी ६:३५) अनडॉक करण्याचा प्रयत्न करणार नाहीत. या आठवड्याच्या अखेरीस हवामानात सुधारणा होऊ शकते, असा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे. यामुळे क्रू ८ मिशनला पृथ्वीवर परत येण्यासाठी सुरक्षित वेळ मिळू शकेल. क्रू-८ मिशनच्या क्रूमध्ये अंतराळवीर मॅथ्यू डॉमिनिक, जीनेट एप्स, माइक बॅरेट हे नासाचे तर रशियाच्या रोसकॉसमॉसचे अलेक्झांडर ग्रेबेनकिन यांचा समावेश आहे. सध्या, हा क्रू इंटरनॅशनल स्पेस स्टेशनवर आहे. अर्थात, त्यांनी त्यांची दैनंदिन कामं सुरूच ठेवली आहेत. त्यामध्ये व्यायाम तसेच स्थानकावरील कार्माचाही समावेश आहे.



## हरणाच्या बेंबीपासून परफ्यूम

जंगलात एक कस्तुरी मृग राहतो, ज्याच्या बेंबीचा सुगंध हा जगातील सर्वात आकर्षक असा सुगंध आहे, हे कविता आणि निबंधांमध्ये वाचत आलो आहोत. तर या सुगंधाची इच्छा इतकी प्रबळ आहे की तो सुगंध मिळविण्यासाठी मानवाने मोठ्या प्रमाणावर हरणांची शिकार केली आहे. अनेक लोक यावर विश्वास ठेवत नाहीत. याला केवळ एक गैरसमज मानतात. पण, खास मृग (हरीण) 'कस्तुरी' आणि त्यातून येणाऱ्या अप्रतिम सुगंधाविषयी काही वास्तविक तथ्ये लक्षवेधी आहेत. प्रकृती पर्यावरण आणि वन्यजीव सोसायटीचे प्रोजेक्ट मॅनेजर अभिषेक यांनी याबाबत माहिती दिली. ते मागील २५ वर्षांपासून वन्यजीवांसह काम करत आहेत. त्यांनी सांगितले की, 'कस्तुरी' एक विशेष हरीण आहे, जे सामान्य हरीण आणि काळवीटपेक्षा वेगळे आहे. याला इंग्रजीत 'मस्क डियर (कस्तुरी मृग)' असे म्हणतात. हे मुळात एंटीलोप हरणांच्या प्रजातीमध्ये येतात. त्यांचे म्हणणे आहे की, कस्तुरी मृगाच्या बेंबीत एक थैली असते, जी 'कस्तुरी' नावाच्या सुगंधी पदार्थाने भरलेली असते. जगातील सर्वोत्तम परफ्यूममध्ये त्याची गणना केली जाते, इतका हा पदार्थ इतका सुगंधित आहे.

आणखी एक आश्चर्य म्हणजे कस्तुरी (मस्क) जो जगातील सर्वोत्तम परफ्यूमपैकी एक परफ्यूम आहे, तो कस्तुरीपासून बनवला जातो, म्हणून त्याला 'कस्तुरी' म्हणतात. अभिषेक यांनी दिलेल्या माहितीनुसार, जसजशी हरणांची वाढ होते तसतसे त्यांच्या बेंबीतील कस्तुरीचा सुगंधही वाढतो. सर्वात महत्त्वाचे म्हणजे हा आकर्षक पदार्थ फक्त नर हरणांमध्येच आढळतो. तर मादी कस्तुरीपासून वंचित राहतात. हरणाच्या बेंबीचा आकार चामड्याच्या बॉलसारखा असतो. यामध्ये सुगंधी पदार्थ अर्ध-घन (जेली सारख्या) स्वरुपात भरलेला असतो. कस्तुरीचा सुगंध हलका, आकर्षक आणि दीर्घकाळ टिकणारा असतो. तसेच त्याची किंमत ३० हजार रुपये प्रति ग्रॅमपर्यंत असल्याचे सांगितले जाते.

## उष्ण आवरणाचा बाह्यग्रह

गिआपल्या ग्रहमालिकेतील सर्वात मोठा ग्रह असलेला गुरू हा निव्वळ वायूचा मोठा गोळा आहे. त्याच्यावर उष्ण व दाट असे आवरण असते. असेच उष्ण, दाट आवरण असलेला बाह्यग्रह शोधण्यात आलेला असून तो पृथ्वीपासून १८०० प्रकाशवर्षे दूर आहे. सूर्यासारख्या सहा अब्ज वर्षे जुन्या ताऱ्याभोवती हा ग्रह फिरत असून अधिक्रमणामुळे तो सापडला आहे. ग्रहाचे नाव एपिक २२०५०४३३८ बी असे असून तो नासाच्या केप्लर के २ मोहिमेत प्रथम शोधला गेला.




चिलीच्या पॉंटिफिकल कॅथोलिक विद्यापीठाचे नेस्टर एस्पिनोझा यांनी युरोपीय खगोल संशोधन संस्थेच्या इशेली वर्णपंक्ती यंत्रणेचा (फेरॉस) वापर करून पाठपुराव्याचे संशोधन केले. फेरॉस यंत्रणेमुळे एपिक २२०५०४३३८ बी या गुरूसारख्या उष्ण ग्रहाची निरीक्षणे शक्य झाली.

मातृताऱ्यासमोर त्याचे अधिक्रमण झाले ते पाहता आले. धातूंनी परिपूर्ण असलेल्या गुरूसारख्या ग्रहाचा शोध फोटोमेट्री तंत्राने लावण्यात आला आहे. एपिक २२०५०४३३८ बी हा वायूरूप व महाकाय ग्रह आहे त्याची गुणवैशिष्ट्ये ही गुरूसारखीच आहेत. त्याचा कक्षीय काळ १० दिवसांपेक्षा कमी आहे. पृष्ठीय तापमान जास्त, ताऱ्याच्या निकट अशी नवीन ग्रहाची वैशिष्ट्ये आहेत. या संशोधनानुसार एपिक २२०५०४३३८ बी हा ग्रह गुरूपेक्षा १० टक्क्यांनी लहान आहे, तर त्याचे वस्तुमान गुरूपेक्षा ३० टक्के अधिक आहे. तो ताऱ्याभोवती ५.८ दिवसांत प्रदक्षिणा पूर्ण करतो. त्याची घनता २.२ प्रतिघनसेंटिमीटर आहे व त्याचे समतोल तापमान ८८६ अंश सेल्सियस असून तो गुरूसारखा तप्त असून वस्तुमान मात्र थोडे कमी आहे.

## प्लॅनेट एक्स सौरमालेसाठी गंडांतर?

आपल्या सौरमालेमध्ये सूर्य हा तारा आणि आठ ग्रह आहेत. मात्र, नेपच्यूनच्याही पुढे सौरमालेच्या टोकाशी एक छुपा, नववा ग्रहही असल्याचे अनेकांचे म्हणणे असते. त्याला प्लॅनेट एक्स असे संबोधले जाते. हा नववा ग्रह सौरमालेला धोकादायक ठरू शकतो, असे एका ब्रिटिश खगोलशास्त्रज्ञाने म्हटलेले आहे. जर सूर्याचा अंत झाला, तर हा गूढ ग्रह सौरमालेतील इतर ग्रहांना धोकादायक ठरू शकतो. ब्रिटनमधील वारविक विद्यापीठातील प्रा. दिमीत्री वेरास यांच्या मते नवव्या ग्रहाचे अस्तित्व अजून सिद्ध झालेले नाही; पण तो असेलच तर त्याचे अस्तित्व अन्य ग्रहांसाठी धोकादायक ठरू शकते. आपल्या सौरमालेबाहेर नववा ग्रह आहे, असे गृहीतक अनेक वर्षे मांडले जात असून, त्याच्यामुळे सूर्याचा अंत झाल्यानंतर एका मोठ्या ग्रहाचा बळी जाऊ शकतो. पिनबॉल परिणामामुळे एखादा ग्रह आंतरतारकीय अवकाशात फेकला जाण्याची शक्यता आहे.

जेव्हा सूर्याची मृत्यू प्रक्रिया आणखी सात अब्ज वर्षांनी सुरू होईल, तेव्हा तो त्याचे निम्मे वस्तुमान फेकून देईल व फुगेल. त्यात पृथ्वी गिळंकृत होऊ शकते. नंतर सूर्याचे श्वेतबटू ताऱ्यात रूपांतर होईल. सूर्यातून




वस्तुमान फेकले गेले तर त्यामुळे गुरू, शनी, युरेनस व नेपच्यून हे ग्रह आतापर्यंत ज्या सुरक्षित अंतरावर आहेत तेथे राहणार नाहीत. वेरास यांच्या मते नववा ग्रह आहे व तो सुखान्त घडवून आणील. नववा ग्रह हा इतर ग्रहांप्रमाणे फेकला जाणार नाही व तो आतमध्ये ढकलला जाईल. तो युरेनस ते नेपच्यून यासारख्या एकूण चार मोठ्या ग्रहांबरोबर मृत्यूच्या तांडवात ढकलला जाईल. सौरमालेतून वस्तुमान बाहेर पडत असताना ते कायमचे बाहेर पडेल. ग्रहमालांचा मृत्यू कसा होऊ शकतो, याबाबत काही संकेतावली तयार केल्या गेल्या आहेत. त्यामध्ये वेरास यांच्या मते नववा ग्रह सौरमालेचे भवितव्य बदलू शकतो. या ग्रहामुळे सौरमालेला हिंसक भवितव्याला तोंड द्यावे लागू शकते. अनेक श्वेतबटू ताऱ्यांवर सध्या खडक आहेत. त्यामध्ये अशाच विध्वंसक वैश्विक घटनांची चिन्हे सापडतात. इतर ग्रहमालांमध्येही असा अतिरिक्त व छुपा ग्रह असू शकतो. सूर्याचा मृत्यू कसा होईल, याबाबतच्या स्पष्टीकरणातून अन्य ग्रहमालांच्या उत्क्रांतीवर नवा प्रकाश पडू शकतो. सूर्याच्या स्फोटातून दूरवरचे युरेनस व नेपच्यूनही वाचू शकत नाहीत. सौरमालेचे भवितव्य या नवव्या ग्रहाच्या वस्तुमान व कक्षीय गुणधर्माशी निगडित आहे, असे वेरास यांनी म्हटले आहे.


## मणिपूरमधील पेच; भाजप अध्यक्ष नड्डा यांच्या पत्रावरून काँग्रेस-भाजप वाद

# मुख्यमंत्र्यांना हटवल्यास 'एनपीए' पाठिंबा देणार

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क







**इंफाळ :** भाजपने मुख्यमंत्री यांना हटवल्यास पक्ष आपल्या निर्णयावर पुनर्विचार करू शकतो, असे 'एनपीपी'चे राष्ट्रीय उपाध्यक्ष युम्नाम जॉयकुमार सिंग म्हणाले. या पक्षाने गेल्या काही दिवसांपूर्वी भाजप सरकारचा पाठिंबा काढून घेतला आहे. दरम्यान, मणिपूरमधील प्रश्नावरून काँग्रेसने टीका केल्यानंतर भाजपचे अध्यक्ष जे. पी. नड्डा यांनी काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जून खर्गे यांना पत्र पाठवले असून, त्यात काँग्रेसवर टीका केली आहे. या पत्रावरून काँग्रेसने पुन्हा भाजपला धारेवर धरले आहे.

राज्यात शांतता प्रस्थापित करण्यात बिरेन सिंग पूर्णपणे अपयशी ठरले आहेत. त्यामुळे 'एनपीपी'च्या राष्ट्रीय अध्यक्षांनी सरकारचा पाठिंबा काढून घेतला. तथापि, समर्थन मागे घेतल्याचा मणिपूर सरकारवर कोणताही परिणाम झाला नाही. कारण भाजपकडे ६० सदस्यांच्या सभागृहात ३२ आमदारांसह पूर्ण बहुमत आहे. नागा पीपल्स फ्रंट आणि संयुक्त जनता दल हेदेखील सत्ताधारी आघाडीत आहेत. गोंधळामुळे आमदार सहभागी झाले असावेत. १८ नोव्हेंबर रोजी मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीला 'एनपीपी'चे तीन आमदार उपस्थित होते. हे गोंधळामुळे असू शकते असा दावा जॉयकुमार यांनी केला. ही बैठक 'एनडीए'च्या आमदारांसाठी होती. आम्ही फक्त बीरेन सिंग यांच्या नेतृत्वाखालील सरकारचा पाठिंबा काढून घेतला आहे; पण आम्ही अजूनही 'एनडीए'चे मित्र आहोत;मात्र प्रदेश किंवा राष्ट्रीय अध्यक्षांच्या पूर्वपरवानगीशिवाय अशा बैठकांना उपस्थित राहिल्यास त्यांच्यावर कारवाई होऊ शकते, असा इशारा आम्ही आमच्या आमदारांना दिला आहे.

मणिपूरमध्ये आमदारांच्या घरांवर झालेल्या हल्ल्यात दीड कोटी रुपयांचे दागिने लुटल्याचे उघड झाले आहे. संयुक्त जनता दलाचे आमदार के. जयकिशन सिंग यांच्या आईने पोलिसांत तक्रार दाखल केली आहे. तोडफोड करणाऱ्या जमावाने थांगमेईबंद भागातील आमदारांच्या निवासस्थानातून १८ लाखांची रोकडही लुटली. विस्थापितांसाठी ठेवलेल्या अनेक वस्तूंचीही नासधूस करण्यात आली. हिंसाचारात लॉकर्स, इलेक्ट्रॉनिक्स वस्तू आणि फर्निचरची तोडफोड करण्यात आल्याचा दावा मदत शिबिरातील स्वयंसेवक सनाय यांनी केला. जमावाने ७ गॅस सिलिंडर काढून घेतले. विस्थापितांची कागदपत्रे नष्ट करण्यात आली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १६ नोव्हेंबरच्या संध्याकाळी जमावाने आमदारांच्या निवासस्थानाची सुमारे दोन तास तोडफोड केली. आमदार त्या वेळी कुटुंबातील एका सदस्याच्या उपचारासाठी दिल्लीत होते.

मणिपूरमध्ये गेल्या आठवड्यात हिंसाचार वाढल्यानंतर संतप्त लोकांनी अनेक आमदारांच्या घरांची तोडफोड केली. जिरीबाम जिल्ह्यातील एका मदत शिबिरातून तीन महिला आणि तीन मुले बेपत्ता झाल्यानंतर हिंसाचार उसळला होता.

### काँग्रेस घेते परकीय शक्तींची मदत

● नड्डा यांनी मणिपूर हिंसाचाराच्या संदर्भात खर्गे यांना पत्र लिहून म्हटले आहे, की धक्कादायक गोष्ट म्हणजे काँग्रेस पक्ष मणिपूरमधील परिस्थिती सनसनाटी बनवण्याचा वारंवार प्रयत्न करत आहे. भारताच्या प्रगतीला खीळ घालण्यासाठी काँग्रेस नेते परकीय शक्तींचा पाठिंबा घेतात आणि त्यांना प्रोत्साहन देतात हे 'चिंताजनक' आहे.



## अफगाणमध्ये इस्लामविरोधी पुस्तकांवर बंदी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**काबुल :** सत्तेवर आल्यानंतर तालिबानने अफगाणिस्तानातील गैर-इस्लामिक आणि सरकारविरोधी साहित्य काढून टाकण्याचे प्रयत्न सुरू केले आहेत .त्यानुसार २०२१ ते ऑक्टोबर २०२३ पर्यंत तालिबानने इस्लामी आणि अफगाण मूल्यांच्या विरोधात ४०० हून अधिक पुस्तके जप्त केली आहेत. जप्त केलेल्या पुस्तकांच्या जागी कुराण आणि इस्लामिक ग्रंथांचे वितरण सुरू झाले. याशिवाय इतर देशांतून येणाऱ्या पुस्तकांची ३ महिने तपासणी केली जाते, त्यात इस्लामिक वाटणारी अनेक पुस्तके काढून टाकली जातात.

तालिबानने खलील जिब्रानचे जीसस द सन ऑफ मॅन, इस्माईल कादरे यांचे ट्रायलाइट ऑफ द ईस्टर्न गॉड्स, मिरवाईस बल्खी यांचे अफगाणिस्तान आणि प्रदेश आदी पुस्तकांवर बंदी घातली आहे. पुस्तकांवर बंदी घातल्याने अनेक स्थानिक प्रकाशक आणि पुस्तक विक्रेते भीती आणि अनिश्चिततेच्या वातावरणात काम करत आहेत.

यामुळे, कल्पनांची विविधता आणि शैक्षणिक साहित्याचा प्रवेश मर्यादित झाला आहे. बंदीमुळे स्थानिक आणि आंतरराष्ट्रीय साहित्यिकांच्या योगदानाकडे दुर्लक्ष होत आहे. तालिबान दावा करतात की त्यांची सेन्सॉरशिप धर्म आणि सांस्कृतिक मूल्यांचे रक्षण करण्यासाठी आहे. कायद्यांचे पालन गैर-इस्लामी कल्पनांना प्रतिबंधित करते.

मोहम्मद सेदिक खादेमी नावाच्या अधिकाऱ्याने एएफपीला सांगितले की, आम्ही कोणत्याही विशिष्ट देशाच्या किंवा व्यक्तीच्या पुस्तकांवर बंदी घातली नाही, परंतु आम्ही पुस्तकांचा अभ्यास करतो. आम्ही धर्म, शरिया किंवा सरकारचा विरोध करणारी किंवा सजीव वस्तूंची चित्रे असलेली पुस्तके ब्लॉक करतो. कोणतीही पुस्तके धर्म, श्रद्धा, पंथ, शरिया यांच्या विरोधात असतील तर आम्ही त्यांना परवानगी देणार नाही, असेही ते म्हणाले.

पुस्तकांवर बंदी घातल्याने अनेक स्थानिक प्रकाशक आणि पुस्तक विक्रेते भीती आणि अनिश्चिततेच्या वातावरणात काम करत आहेत.

## जादा मतदान होऊनही अखिलेश चिंतित

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**लखनऊ :** पोटनिवडणुकीत समाजवादी पक्षाकडे असलेल्या विधानसभा जागांवर इतर जागांच्या तुलनेत जास्त मतदान झाले. असे असतानाही समाजवादी पक्षाने निवडणूक आयोगाला पत्र लिहून मीरापूर, कुंडरकी, सिसामऊ आणि कटहारी या जागांवर पुन्हा मतदान घेण्याची मागणी केली आहे. अशा परिस्थितीत अधिक मतदान होऊनही समाजवादी पक्ष राजकीय ताण वाढून पुन्हा पोटनिवडणुकीची मागणी का होत आहे, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

उत्तर प्रदेशच्या नऊ विधानसभा जागांवर झालेल्या पोटनिवडणुकीत कुंडरकी जागेवर सर्वाधिक मतदान झाले. कुंदरकी जागेवर ५७.७ टक्के मतदान झाले. त्याचप्रमाणे मीरापूरमध्ये ५७.१ टक्के, कटहारीमध्ये ५६.९ टक्के, करहालमध्ये ५४.१ टक्के आणि सिसामळमध्ये ४९.१ टक्के मतदान झाले.

गाझियाबादमध्ये ३३.३ टक्के, खैरमध्ये ४६.३ टक्के, फुलपूरमध्ये ४३.४ टक्के आणि माझवानमध्ये ५०.४ टक्के मतदान झाले. पोटनिवडणुकीत समाजवादी पक्षाकडे असलेल्या सर्व जागांवर ५० टक्क्यांहून अधिक मतदान झाले. भाजपकडे असलेल्या जागांवर ५० टक्क्यांहून कमी मतदान झाले होते. 'आरएलडी'ने २०२२ मध्ये समाजवादी पक्षाच्या पाठिंब्याने मीरापूरची जागा जिंकली होती. कुंडरकीमध्ये ६२ टक्के, मीरापूरमध्ये ४० टक्के आणि सिसामळमध्ये ५० टक्के मुस्लिम मतदारांमुळे समाजवादी पक्ष वरचढ ठरला आहे. करहल, सिसामाऊ, कटहारी आणि कुंडरकी या जागांवरून समाजवादी पक्षाचे आमदार निवडून येत आहेत. त्यामुळे समाजवादी पक्षाच्या या जागा जिंकणे भाजपसाठी कठीण असल्याचे बोलले जात होते.

या पार्श्वभूमीवर कुंडरकी मतदारसंघातील समाजवादी पक्षाचे उमेदवार हाजी रिझवान यांनी निवडणूक आयोगाला पत्र लिहून पोटनिवडणूक रद्द करून सर्व बूथवर पुन्हा मतदान घेण्याची मागणी केली आहे.

### मतांच्या ध्रुवीकरणाचा भाजपला फायदा

● पोटनिवडणुकीत हिंदू मतदार असलेल्या भागात प्रचंड मतदान झाले, तर मुस्लिम उमेदवार असलेल्या भागात मतदान झाले नाही. मुस्लिम मतांच्या विभाजनामुळे सपमध्ये तणाव निर्माण होतो. पोटनिवडणुकीत करहल, कुंडरकी आणि सिसामाऊ जागेवर भाजप आणि सप यांच्यात थेट लढत होती, तर मीरापूर जागेवर आरएलडी आणि सप यांच्यात थेट लढत मानली जात होती. अशा स्थितीत मुस्लिम मतांची विभागणी होताना दिसत आहे.

## उज्जैनहून नेपाळमध्ये लाडू

पंढरी संचार छायाचित्रसेवा



**उज्जैन :** नेपाळमधील मिथिला येथे भगवान महाकालच्या लाडू प्रसादाचे वाटप केले जाणार आहे. मध्य प्रदेशातील उज्जैन येथील श्री महाकालेश्वर मंदिर व्यवस्थापन समितीने तयार केलेले १ लाख ११ हजार १११ लाडू मिथिलाला रवाना करताना मुख्यमंत्री मोहन यादव.

## Selected

### धुक्यामुळे रेल्वे वाहतुकीत अडथळे

**नवी दिल्ली :** धुक्यामुळे शुक्रवारी पूर्वेकडे जाणाऱ्या प्रवाशांचे



हाल झाले. दिल्लीकडे येणाऱ्या आणि जाणाऱ्या ४० ट्रेन १ ते २६ तास उशिराने धावत आहेत. दिल्लीहून बिहारच्या शहरांसाठी सुटणाऱ्या अनेक गाड्यांच्या वेळा बदलाव्या लागल्या. अनेक गाड्यांच्या सुटण्याच्या वेळा बदलाव्या लागल्या. लोकांना संपूर्ण रात्र फलाटावर काढावी लागली आहे.

### रेल्वेच्या डब्यात निघाला साप

**भोपाळ :** भोपाळहून जबलपूरला जाणाऱ्या जनशताब्दी एक्स्प्रेसच्या एसी कोचमध्ये रेल्वेच्या सामान ठेवण्याच्या परिसरात विषारी साप निघाल्याने प्रवाशांमध्ये घबराट पसरली होती. भोपाळहून जबलपूरला येणाऱ्या जनशताब्दी एक्स्प्रेसच्या सी-१ डब्यात ही घटना घडली. ट्रेनमध्ये साप पाहून प्रवाशांमध्ये आरडाओरडा झाला आणि चेंगराचेंगरीसारखे वातावरण निर्माण झाले. या घटनेचा व्हिडीओ 'सोशल मीडिया'वर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. त्यात सापाला पाहिल्यानंतर लोक किती चिंतेत आहेत हे स्पष्टपणे दिसत आहे. या घटनेची माहिती मिळताच रेल्वे प्रशासनाने तत्काळ कारवाई करत या प्रकरणाचा तपास सुरू केला.

### लग्नात वराला भेटताना मित्राचा हृदयविकाराने मृत्यू

**हैदराबाद :** आंध्र प्रदेशातील कुरनूलमध्ये लग्नादरम्यान एका व्यक्तीला अचानक हृदयविकाराचा झटका आ आला. वामसी नावाचा तरुण वधू-वरांना शुभेच्छा देत वराला भेटवस्तू देत



असताना ही घटना घडली. अचानक त्याचा तोल गेला आणि तो खाली पडला. बेंगळुरूमधील ॲमेझॉनमध्ये काम करणारा वामसी त्याच्या मित्राच्या लग्नात सहभागी होण्यासाठी कुर्नूलमधील पेनुमाडा गावात आला होता. वराने भेटवस्तू स्वीकारली, तेव्हा वामसी अचानक डावीकडे झुकू लागला आणि तो पडण्यापूर्वीच शेजारी उभ्या असलेल्या लोकांनी त्याला पकडले. त्यांना तात्काळ डॉन शहरातील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. तिथे हृदयविकाराच्या झटक्याने त्याचा मृत्यू झाला.

### इस्रायलचे पंतप्रधान नेतन्याहू विरोधात अटक वॉरंट जारी

**इस्रायल :** आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी न्यायालयाने इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू आणि त्यांचे संरक्षण मंत्री योव गॅलंट यांच्याविरोधात अटक वॉरंट जारी केले आहे. हेग स्थित जागतिक न्यायालयाने गाझा आणि लेबनॉनमधील संघर्षादरम्यान केलेल्या युद्ध गुन्ह्यांबद्दल इस्रायलच्या नेत्यांविरुद्ध हे वॉरंट जारी केले आहे, ज्याठिकाणी ते हमास आणि हिजबुल्लाह यांच्याशी युद्ध करत आहेत. आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी न्यायालयानेही हमासचे लष्करी प्रमुख मोहम्मद डेफ यांना युद्ध गुन्हेगार ठरवत अटक करण्याचे आदेश दिले आहेत. एका अधिकृत निवेदनात, जागतिक न्यायालयाने म्हटले आहे की, "चेंबरने हे वॉरंट जारी केले आहे, बेंजामिन नेतन्याहू आणि योव गॅलंट या दोन व्यक्तींना युद्ध गुन्ह्यासाठी जबाबदार धरले आहे."ICC ने नेतान्याहू आणि इस्रायलचे माजी संरक्षण मंत्री योव गॅलंट यांच्यावर खून, अत्याचार आणि अमानवीय कृत्यांसह, तसेच युद्धाची पद्धत म्हणून उपासमारीचा युद्ध गुन्हा दाखल केला आहे. इस्रायलने आयसीसीने आपल्या नेत्यांवर लावलेले आरोप फेटाळून लावले आहेत. असा निर्णय आयसीसीच्या अखत्यारित येत नसल्याचे इस्रायलचे म्हणणे आहे.

## आण्विक कार्यक्रमाबाबत इराणला मोठा झटका

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**तेहरान :** इराणला त्याच्या आण्विक कार्यक्रमाबाबत मोठा झटका बसला आहे. तेहरानच्या इशाऱ्याला न जुमानता 'आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा एजन्सी'च्या (आएईए) 'बोर्ड ऑफ गव्हर्नर्स'ने तेहरानच्या विरोधात निषेधाचा ठराव मंजूर केला आहे. इराणवर संयुक्त राष्ट्रांच्या देखरेख संस्थेला सहकार्य न केल्याचा आरोप आहे.

या प्रस्तावात इराणला लवकरात लवकर 'आयएईए' सोबत सहकार्य वाढवण्यास सांगितले आहे. इराणच्या विरोधात आणलेल्या ठरावावर मतदान झाले, तेव्हा तेहरानला पाठिंबा देणारे फक्त ३ देश होते. त्याचे मजबूत मित्र चीन, रशिया तसेच एक देश होता, जो अत्यंत गरीब आहे आणि सध्या राजकीय आव्हानांचा सामना करत आहे. या तीन देशांनी इराणला पाठिंबा दिला. 'आयएईए'च्या 'बोर्ड ऑफ गव्हर्नर्स'च्या बैठकीत इराणच्या विरोधात आणलेला ठराव १९ मतांनी मंजूर करण्यात आला. ब्रिटन, जर्मनी, फ्रान्स आणि अमेरिकेने आणलेल्या या प्रस्तावाच्या विरोधात रशिया, चीन आणि बुर्किना फासोने मतदान केले, तर १२ देशांनी मतदानात भाग घेतला नाही.

यापूर्वी जूनमध्येही इराणविरोधात असाच ठराव मंजूर करण्यात आला होता. त्यानंतरही रशिया, चीन आणि बुर्किना फासो इराणच्या विरोधात ठामपणे उभे राहिले. बुर्किना फासो हा पश्चिम आफ्रिकेतील एक अतिशय गरीब देश आहे.

## न्यूयॉर्क स्टॉक एक्स्चेंजमध्ये बॉम्ब स्फोटाचा कट

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**न्यूयॉर्क :** न्यूयॉर्क स्टॉक एक्स्चेंजमध्ये बॉम्बस्फोट घडवण्याची योजना आखणाऱ्या एका व्यक्तीला अमेरिकन पोलिसांनी अटक केली आहे. हा कट यशस्वीपणे उधळून लावल्यानंतर न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या कागदपत्रांत याबाबतची माहिती तपास संस्थांकडून देण्यात आली आहे.

हारुण अब्दुल-मलिक येनर असे अटक केलेल्या व्यक्तीचे नाव असून तो 30 वर्षांचा असल्याचे सांगण्यात येत आहे. हा व्यक्ती फ्लोरिडा भागातील रहिवासी असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. तथापि, ते एका ठिकाणी थांबत नाही. संशयित बेघर व्यक्तीप्रमाणे राहत होता. अटक करण्यात आलेल्या व्यक्तीने आपली काय योजना होती ते अधिकाऱ्यांसमोर उघड केले असल्याचा दावा करण्यात आला आहे.

फेडरल ब्युरो ऑफ इन्व्हेस्टिगेशन (एफबीआय) च्या एजंटांनी महिनाभराच्या तपासानंतर हारुण अब्दुल-मलिक येनरला अटक केली आहे.

## रशिया-युक्रेनकडून महाघातकी क्षेणास्त्रांचा वापर

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**रशिया :** रशिया-युक्रेन संघर्ष आता तिसऱ्या महायुद्धाकडे वाटचाल करताना दिसत आहे. रशियाने गुरुवारी (२१ नोव्हेंबर) युक्रेनवर प्रत्युत्तर म्हणून आंतरखंडीय क्षेपणास्त्र त्याच्या दक्षिण अस्त्रखान भागातून डागले. मॉस्कोने युद्धात एवढ्या शक्तिशाली आणि लांब पल्ल्याच्या क्षेपणास्त्राचा वापर करण्याची ही पहिलीच वेळ आहे. युक्रेनने या आठवड्यात रशियाच्या हद्दीत खोलवर असलेल्या लष्करी लक्ष्यांवर हल्ला करण्यासाठी अमेरिका आणि ब्रिटनने बनवलेल्या क्षेपणास्त्रांचा वापर केल्याने हा हवाई हल्ला झाला आहे.

रशिया-युक्रे यांच्यात गेल्या ३३ महिन्यांपासून सुरू असलेल्या युद्धाची भीषणता वाढत आहे. युक्रेनने रशियाच्या हद्दीत ब्रिटनची स्टॉर्म शॅडो मिसाईल डागली आहे. तर अमेरिकेने युद्धाचे वातावरण बिघडवण्याच्या दिशेने आणखी एक पाऊल टाकले आहे आणि आता युक्रेनला रशियाविरूद्ध अमेरिकन अँटीपर्सोनल लँड माइन्स वापरण्याची परवानगी दिली आहे. मात्र, रशियाने प्रत्युत्तराच्या कारवाईचा इशारा दिल्यानंतर अमेरिकेने कीवमधील आपला दूतावास बंद करून तेथील नागरिकांना सुरक्षित ठिकाणी जाण्याच्या सूचना दिल्या.

इटली, स्पेन आणि ग्रीसनेही युक्रेनमधील त्यांचे दूतावास बंद केले आहेत. फ्रेंच दूतावास खुला असला तरी त्यांनी त्यांच्या नागरिकांना सतर्क राहण्यास सांगितले आहे.

### पुढच्या महिन्यापासून ट्रॅक टाकणार

# भारतीय रेल्वे धावणार चीन सीमेपर्यंत

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**डेहराडून :** लडाखमध्ये चीनसोबतचा तणाव कमी होत असला, तरी भारताने भविष्यासाठी तयारी सुरू केली आहे. भारतीय रेल्वे उत्तराखंडमधील चीन सीमेपर्यंत लवकरच धावताना दिसेल. नवा रेल्वे ट्रॅक चंपावत जिल्ह्यातील टनकपूर ते बागेश्वर दरम्यान बांधला जाणार आहे. या १६९ किलोमीटर लांबीच्या लोहमार्गाचे सर्वेक्षणाचे काम जवळपास पूर्ण झाले आहे.

हा रेल्वे मार्ग हिमालयाच्या उंच पर्वतरांगांमधून जाणार असून चीनच्या सीमेवर पिथौरागढ आणि बागेश्वरपर्यंत पोहोचणार आहे. रेल्वेचे जनसंपर्क अधिकारी राजेंद्र सिंह यांच्या म्हणण्यानुसार, नवीन रेल्वे मार्ग रणनीतिकदृष्ट्या महत्त्वाचा आहे. कारण पिथौरागढ जिल्हा नेपाळ आणि चीनच्या आंतरराष्ट्रीय सीमेला जोडलेला आहे. टनकपूर हे भारत-नेपाळ सीमेवरील एक क्षेत्र आहे आणि उत्तराखंडमधील नेपाळ सीमेवरील भारतातील शेवटचे रेल्वे स्टेशन आहे. या मार्गावर सर्वेक्षणासह खांब बसविण्याचे काम सुरू झाले आहे.

सध्या रस्त्याने चीन सीमेपर्यंत पोहोचण्यासाठी १६ तासांपेक्षा जास्त वेळ लागतो. पिथौरागढ जिल्ह्यातील उंच हिमालयीन भागात चीनला जाण्यासाठी ५ पास आहेत. यामध्ये लुम्पिया धुरा, लेविधुरा, लिपुलेख, उंट जयंती आणि दरमा पासेसचा समावेश आहे. हे सर्व ५ हजार मीटरपेक्षा जास्त उंचीवर वसलेले आहेत. त्यामुळे या भागांमध्ये जलद पुरवठा करणे लष्करासाठी आव्हानात्मक आहे.

### लवकरच ट्रॅकला सुरुवात

● डिसेंबरपासून येथे ट्रॅक टाकण्यात येणार आहेत. १२५ किलोमीटर मार्गापैकी ८५ किलोमीटरमध्ये बोगदे खोदण्यात आले आहेत. रेल्वे विकास निगमचे व्यवस्थापक अजित सिंह यादव यांच्या म्हणण्यानुसार, आणखी १६ किलोमीटर बोगदा खोदायचा आहे. हे काम मार्च २०२५ पर्यंत पूर्ण करायचे आहे.



pandharisanchar.com

# SPORTS

शनिवार, २३ नोव्हेंबर २०२४ | पंढरी संचार | ८

BREAKING NEWS AND MORE



## राहुलची विकेट अडकली वादात

पर्थमधील ऑप्टस स्टेडियम येथे हा सामना सामना सुरु असून पहिल्याच सत्रात भारताचे फलंदाज संघर्ष करताना दिसले आहेत. त्यातही चांगल्या लयीत दिसणाऱ्या केएल राहुलची विकेट चर्चेचा विषय ठरली. या सामन्यात भारताचा प्रभारी कर्णधार जसप्रीत बुमराहने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. रोहित शर्माच्या अनुपस्थितीत यशस्वी जैस्वालसोबत सलामीला फलंदाजासाठी केएल राहुल मैदानात उतरला होता. पण सलामीवीर यशस्वी जैस्वाल ८ चेंडूत शुन्यावर बाद झाला. या षटकातील दुसऱ्या चेंडूवर केएल राहुलने रक्षात्मक खेळण्याचा प्रयत्न केला, पण चेंडू त्याच्या बॅटच्या जवळून मागे यष्टीरक्षकाकडे गेला. परंतु,ऑस्ट्रेलियाच्या अपीलवर मैदानावरील पंचांनी नाबाद दिले. त्यानंतर ऑस्ट्रेलियाने डीआरएसची मागणी केली. यामध्ये अल्ट्रा एजमध्ये स्पाईक्स दिसून आले. त्यामुळे थर्ड अंपायरने केएल राहुलला बाद दिले.

### भारताच्या १५० धावा : ऑस्ट्रेलियाची धावसंख्या ६७/७, बुमराहचे ४ बळी

# भारतीय माऱ्यासमोर कांगारु गारद

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पर्थ :** भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेला सुरुवात झाली असून पहिला सामना पर्थमध्ये खेळला जात आहे. या सामन्याचा पहिला दिवस गोलंदाजांच्या नावावर होता आणि फलंदाजांना धावांसाठी संघर्ष करावा लागला. ऑस्ट्रेलियन गोलंदाजांसमोर भारतीय फलंदाजांचा प्रथम फ्लॉप शो पाहिला मिळाला आणि पाहुणा संघ केवळ १५० धावा करून सर्वबाद झाला. प्रत्युत्तरात ऑस्ट्रेलियाचे फलंदाजही विशेष काही करू शकले नाहीत आणि ६७ धावांत ७ गडी गमावले. पहिल्या डावातील धावसंख्येच्या आधारे ऑस्ट्रेलिया अजूनही टीम इंडियापेक्षा ८३ धावांनी मागे आहे.



नाणेफेक जिंकल्यानंतर भारताने प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला, पण त्याची सुरुवात खूपच खराब झाली. सलामीवीर यशस्वी जैस्वाल आपले खातेही उघडू शकली नाही आणि तिसऱ्याच षटकात आऊट झाला. यानंतर देवदत्त पडिक्कलही काही करू शकला नाही आणि भारतीय डावातील दुसरा फलंदाज एकही धाव न काढता बाद झाला. विराट कोहलीचा खराब फॉर्म कायम राहिला आणि त्याच्या बॅटमधून फक्त ५ धावा आल्या. सलामीवीर म्हणून खेळणाऱ्या केएल राहुलने काही काळ टिकून राहण्याचा प्रयत्न केला पण तोही ७४ चेंडूत २६ धावा करून बाद झाला.

ध्रुव जुरेलला त्याच्या चांगल्या फॉर्मचा फायदा घेता आला नाही आणि तो ११ धावा करून आऊट झाला. वॉशिंग्टन सुंदरनेही निराशा केली आणि त्याच्या बॅटमधून केवळ ४ धावा आल्या. येथून ऋषभ पंत आणि नवोदित नितीश रेड्डी यांनी ४८ धावा जोडून धावसंख्या १२१ पर्यंत नेली. शेवटची विकेट म्हणून बाद होण्यापूर्वी नितीशने झटपट धावा केल्या आणि ५९ चेंडूंत ४१ धावा केल्या, ज्यात सहा चौकार आणि एक षटकार आहे. ऑस्ट्रेलियाकडून जोश हेझलवूडने सर्वाधिक चार विकेट घेतल्या.

भारतीय कर्णधार जसप्रीत बुमराहचा कहर ऑस्ट्रेलियाच्या डावाच्या सुरुवातीलाच पाहायला मिळाला. आपल्या आंतरराष्ट्रीय कारकिर्दीतील पहिल्या डावात केवळ १० धावा करू शकणाऱ्या नॅथन मॅकस्विनीला त्याने प्रथम बाद केले. उस्मान ख्वाजाही ८ धावा करून बाद झाला, तर स्टीव्ह स्मिथ खातेही उघडू शकला नाही आणि पहिल्याच चेंडूवर एलबीडब्ल्यू झाला. ट्रॅव्हिस हेडने ११, तर मिचेल मार्शने ६ धावा केल्या.

डावाच्या सुरुवातीला जीवदान मिळालेल्या मार्नस लॅबुशेनला त्याचा फायदा उठवता आला नाही आणि ५२ चेंडूत केवळ २ धावा करून तो बाद झाला. कर्णधार पॅट कमिन्सच्या बॅटमधून ३ धावा आल्या. ॲलेक्स कॅरी १९ धावा केल्यानंतर क्रीजवर हजर आहे, तर मिचेल स्टार्कने ३२ धावा केल्या आहेत. भारतासाठी जसप्रीत बुमराहने आतापर्यंत डावात सर्वाधिक चार विकेट घेतल्या आहेत. तर मोहम्मद सिराजने दोन आणि हर्षित राणाने एक यश मिळविले आहे.




## आर्यन्स् क्रिकेट, स्पार्क क्रिकेट संघांची विजयी सलामी !

**पुणे :** स्पोटर्सफिल्ड मॅनेजमेंट तर्फे आयोजित 'स्पोटर्सफिल्ड अजिंक्यपद करंडक' १७ वर्षाखालील आंतरक्लब एक-दिवसीय क्रिकेट स्पर्धेत आर्यन्स् क्रिकेट ॲकॅडमी आणि स्पार्क क्रिकेट ॲकॅडमी या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून स्पर्धेत विजयी सलामी दिली. मुकुंदनगर येथील महाराष्ट्रीय मंडळाच्या क्रिकेट नेक्स्ट ॲकॅडमीच्या मैदानावर झालेल्या स्पर्धेत स्वराज चव्हाण याने केलेल्या शतकी खेळीमुळे आर्यन्स् क्रिकेट ॲकॅडमीने एलिट ईगल्स्चा ५९ धावांनी पराभव केला. पहिल्यांदा फलंदाजी करताना आर्यन्स् क्रिकेट ॲकॅडमीने ५० षटकात २८७ धावांचे आव्हान उभे केले. यामध्ये स्वराज चव्हाण याने ९७ चेंडूत १३ चौकार आणि ३ षटकारांसह १०९ धावांची खेळी केली. सार्थक ढमढेरे याने ५४ धावांचे योगदान दिले. या आव्हानासमोर एलिट ईगल्स् संघाने ४५.३ षटकामध्ये २२८ धावा केल्या. वेदांत देवहाडे याने लढा देताना ८१ धावांची खेळी साकारली. दुसऱ्या सामन्यामध्ये मितेश दमानी याने केलेल्या अचूक गोलंदाजीमुळे स्पार्क क्रिकेट ॲकॅडमीने टेंभेकर फार्म्स ॲकॅडमीचा १७५ धावांनी सहज पराभव केला. पहिल्यांदा फलंदाजी करताना स्पार्क क्रिकेट ॲकॅडमीने २३८ धावा धावफलकावर लावल्या.





## अष्टपैलू संघाची अंतिम फेरीत धडक : ऋषिकेश सामनावीर

**पुणे :** सागर पवार व ऋषिकेश सोनावणे यांच्या शतकांच्या जोरावर अष्टपैलू स्पोर्ट्स संघाने सांगली जिल्हा क्रिकेट असोसिएशन (एसडीसीए) संघाला ११२ धावांनी पराभूत करताना इकोल स्पोर्ट्स फाउंडेशन यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या इकोल टी-२० करंडक स्पर्धेच्या अंतिम फेरीत प्रवेश केला. अंतिम फेरीत अष्टपैलू स्पोर्टस संघासमोर राजस्थान रॉयल्स अकादमी संघाचे आव्हान असणार आहे. प्रथम फलंदाजी करताना अष्टपैलू स्पोर्ट्स संघाने सागर पवार व ऋषिकेश सोनावणे यांच्या शतकांच्या जोरावर निर्धारित २० षटकांत ३ बाद २६१ धावांपर्यंत मजल मारली. सागर पवारने ४८ चेंडूत ४ चौकार व ११ षटकार मारताना १०१ धावांची तर ऋषिकेश सोनावणेने ४९ चेंडूत ७ चौकार व ९ षटकार मारताना नाबाद १०५ धावांची खेळी केली. हर्ष संघवीने ३३ धावांच्या खेळीत ४ चौकार व २ षटकार लगावले. हितेश वाळुंज व सुदीप पाठक यांनी प्रत्येकी १ गडी बाद केला. एसडीसीए संघाचा डाव सारिश देसाईच्या भेदक गोलंदाजीने १६.४ षटकांत सर्वबाद १४९ धावांवर संपुष्टात आला. सुशील बुरलेने सर्वाधिक ५१ धावा करताना ६ चौकार व ३ षटकार लगावले. प्रशांत कोरेने २१, यश नहारने १७, सोमेश गस्तेने १५ धावांचे योगदान दिले. सारीश देसाईने ४, अश्कन काझीने ३ तर इजहान सय्यद व दीपक डांगी यांनी प्रत्येकी १ गडी बाद केला.



### २५ हजार डॉलर पुरुष आयटीएफ टेनिस स्पर्धेत

## दलिबोर सेव्हर्सिना याला विजेतेपद




■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महाराष्ट्र राज्य लॉन टेनिस संघटना(एमएसएलटीए) यांच्या वतीने २५हजार डॉलर पुरुष आयटीएफ टेनिस स्पर्धेत एकेरीत चेक प्रजासत्ताकच्या दलिबोर सेव्हर्सिना याने विजेतेपद संपादन केले.

एमएसएलटीए टेनिस कोर्ट या ठिकाणी पार पडलेल्या या स्पर्धेत पुरुष गटात एकेरीत अंतिम फेरीत दुसऱ्या मानांकित चेक प्रजासत्ताकच्या दलिबोर सेव्हर्सिना याने उझबेकिस्तानच्या अव्वल मानांकित खुमोयुन सुलतानोवचा ३-६, ६-१, ६-२ असा तीन सेटमध्ये संघर्षपूर्ण पराभव करून विजेतेपद पटकावले. हा सामना २ तास १२ मिनिटे चालला. दलिबोर याचे हे दोन आठवड्यातील दुसरे विजेतेपद आहे. पहिला सेट गमावल्यानंतर दलिबोरने अव्वल मानांकित खुमोयुनविरुद्ध दुसऱ्या व तिसऱ्या सेटमध्ये अफलातून खेळ करत विजय मिळवला.

स्पर्धेतील विजेत्या खेळाडूला करंडक, ३६०० डॉलर (३ लाख रुपये), २५ गुण, तर उपविजेत्या जोडीला करंडक, २१२० डॉलर (१लाख ८०हजार रुपये), १६गुण अशी पारितोषिके देण्यात आली.

स्पर्धेचे पारितोषिक वितरण एमएसएलटीएचे मानद सचिव सुंदर अय्यर यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी आयटीएफ सुपरवायझर नितीन कन्नमवार, एमएसएलटीएचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज वैद्य आदी मान्यवर उपस्थित होते.

## मॅव्हेरिक्स क्रिकेट ग्रीन व मॅव्हेरिक्स क्रिकेट रेड यांच्यात अंतिम लढत

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** मॅव्हेरिक्स क्रिकेट अकादमी वाकड यांच्या वतीने आयोजित मॅव्हेरिक्स आंतर क्लब ११ वर्षाखालील क्रिकेट स्पर्धेत मॅव्हेरिक्स क्रिकेट अकादमी ग्रीन संघाने दोन विजय, तर मॅव्हेरिक्स क्रिकेट अकादमी रेड संघाने तीन विजयासह अंतिम फेरीत प्रवेश केला.

३० वायसीए स्पार्क क्रिकेट मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत अखेरच्या साखळी फेरीच्या सामन्यात मॅव्हेरिक्स क्रिकेट अकादमी रेडकडून शिवांश माने (३-२), अर्णव पाटेखेडे(२-१७), आयुश कांबळे(१-१३), अर्शन खान(१-११)यांच्या सुरेख गोलंदाजीपुढे मॅव्हेरिक्स क्रिकेट अकादमी ग्रीन संघाचा डाव १६ षटकात सर्वबाद ९८ धावावर संपुष्टात आला. यात विहान वानखेडे १७, युगांक भालेकर



१५, ओजस बक्षी १४, नमित अग्रवाल १४ यांनी धावा केल्या. या आव्हानाचा पाठलाग करताना मॅव्हेरिक्स क्रिकेट अकादमी रेड संघ ११.१ षटकात सर्वबाद ६६ धावावर कोसळला. यात अर्णव पाटेखेडे १४, सूचित अरोरा १३ यांनी दिलेली लढत अपुरी ठरली. विजयी संघाकडून युगांक भालेकर(३-१७), विहान वानखेडे(२-१४), ओजस बक्षी(१-१६) यांनी अचूक गोलंदाजी करत संघाला ३२ धावांनी विजय मिळवून दिला.

## वीरूच्या लेकाची डबल सेंचुरी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** माजी भारतीय धडाकेबाज सलामी फलंदाज विरेंद्र सेहवागच्या लेकाने कूच बेहार ट्रॉफी स्पर्धेमध्ये द्विशतक ठोकले आहे. शिलाँगमधील एमसीए क्रिकेट मैदानावर सुरू असलेल्या मेघालाविरूद्धच्या सामन्यात दिल्लीकडून खेळताना आर्यवीर सेहवागने २०० धावांची नाबाद खेळी केली. आर्यवीरच्या द्विशतकी खेळीच्या जोडीने दिल्लीने सामन्यात दुसऱ्या दिवसाअंती २०८ धावांची आघाडी घेतली आहे.

मेघालयाचे ५ आगामी फलंदाज अवघ्या ७५ धावांवर बाद झाले. पण, चौथ्या क्रमांकावर फंलदाजीसाठी आलेल्या गौरव नार्लेंगने सावध खेळी केली. त्याने ७ क्रमांकाचा फलंदाज क्षितीजला साथीला घेत ६१ धावांची भागिदारी केली.

## बुल्स् इलेव्हन, टायगर्स इलेव्हन संघांनी दिवस गाजवला !







**पुणे :** पुण्यातील मानांकित आणि ४० वर्ष जुना व आपला इतिहास असलेल्या डेक्कन इलेव्हन क्लबच्यावतीने आयोजित दुसऱ्या 'डेक्कन इलेव्हन प्रिमीअर लीग' फुटबॉल स्पर्धेत बुल्स् इलेव्हन आणि टायगर्स इलेव्हन या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून स्पर्धेच्या उद्घाटनाचा दिवस गाजवला. कर्वेनगर येथील सेवासदन शाळेच्या मैदानावर सुरू झालेल्या या स्पर्धेत १२ वर्षाखालील गटामध्ये अव्देत आपटे याने केलेल्या एकमेव गोलाच्या जोरावर बुल्स् इलेव्हन संघाने वुल्व्हज् इलेव्हन संघाचा १-० असा पराभव केला. टायगर्स इलेव्हन आणि डॉल्फीन्स् इलेव्हन यांच्यातील दुसऱ्या सामना गोलशुन्य बरोबरीमध्ये सुटला. स्कॉर्पीयन्स् इलेव्हन संघाने रायनोज् इलेव्हनचा १-० असा पराभव केला. रत्नाकर कारे याने १२ व्या मिनिटाला गोल करून संघाला विजय मिळवून दिला. १५ वर्षाखालील गटाच्या सामन्यात टायगर्स इलेव्हन संघाने रायनोज् इलेव्हनचा २-० असा सहज पराभव केला. या सामन्यामध्ये दोन्ही गोल अमेय देशपांडे याने नोंदविले. अमेय याने पहिला गोल ६ व्या मिनिटाला तर, दुसरा गोल १५ व्या मिनिटाला करून २-० अशी अजेय आघाडीसह संघाला विजय मिळवून दिला. या स्पर्धेबाबत अधिक माहिती देताना स्पर्धेचे संचालक आणि डेक्कन इलेव्हनचे सुनिल देशपांडे आणि अनिल देशपांडे यांनी सांगितले की, स्पर्धेच्या या दुसऱ्या वर्षामध्ये ८, १२ आणि १५ वर्षाखालील मुले आणि मुलीमिळून सुमारे १८० हुन अधिक खेळाडू सहभागी झाले आहेत. रायनोज् इलेव्हन, स्कॉर्पीयन इलेव्हन, बुल्स् इलेव्हन, वुल्व्हज् इलेव्हन, डॉल्फीन्स् इलेव्हन आणि टायगर्स इलेव्हन या सहा संघांमध्ये विजेतेपदासाठी चुरस पहावयास मिळणार आहे.

## एकाच षटकात कुटल्या ३४ धावा

**नवी दिल्ली :** कोलकाता नाईट रायडर्स संघाने आयपीएल २०२५ साठी संघातून रिलीज केलेल्या इंग्लंडच्या फिल सॉल्टने अबुधाबी टी-१० लीगमध्ये स्पोटक खेळी केली. अबुधाबी संघाकडून खेळताना अजमान बोल्ट्स संघाविरूद्ध सॉल्टने अवघ्या १८ चेंडूत ५२ धावांची खेळी करत जलद अर्धशतक पुर्ण केले.


ज्यामध्ये त्याने एका षटकात ३४ धावा करत धुव्वाधाक कामगिरी केली. अजमान बोल्ट्स संघाच्या ७९ धावांच्या प्रत्युत्तरात अबुधाबी संघाने ८१ धावा केल्या आणि ९ विकेट्सने सामन्यात बाजी मारली.

## पुढील ३ हंगामाच्या तारखा बीसीसीआयने केल्या जाहीर

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** एकिकडे बॉर्डर-गावसकर ट्रॉफी सुरू असतानाच इंडियन प्रीमियर लीग स्पर्धेबाबत मोठी अपडेट समोर आली आहे.

आयपीएल २०२५ हंगामाचा लिलाव २४ आणि २५ नोव्हेंबर रोजी पार पडणार आहे. अशात या लिलावाच्या दोन दिवसआधीच पुढील तीन हंगामाच्या तारखा समोर आल्या आहेत. क्रिकबझने दिलेल्या वृत्तानुसार बीसीसीआयने शुक्रवारी सकाळी बीसीसीआयने फ्रँचायझींशी संपर्क साधला आहे. बीसीसीआयने कळवलेल्या तारखांनुसार आयपीएल २०२५



स्पर्धा १४ मार्च ते २५ मे दरम्यान खेळवली जाणार आहे. तसेच आयपीएल २०२६ स्पर्धा १५ मार्च ते ३१ मे दरम्यान खेळवली जाणार आहे. त्याचबरोबर आयपीएल २०२७ स्पर्धा १४ मार्च ते ३० मे दरम्यान खेळवली जाणार आहे. आयपीएलच्या तारखा आधीच घोषित केल्या असल्याने बीसीसीआय आणि आयपीएल अधिकाऱ्यांसह इतर क्रिकेट बोर्डांसाठीही सोयीस्कर ठरणार आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय क्रिकेट आणि आयपीएल यांच्यात समन्वय राखण्यास मदत होईल.

## 'हमराज'-'अदिश्री'मध्ये अंतिम लढत

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** हमराज मृत्युंजय आणि अदिश्री इंटरप्राइजेस यांच्यात निलेश भिंताडे स्पोर्ट्स फाउंडेशनच्या वतीने आयोजित पुणे जिल्हा टेनिस प्रीमियर एन. बी. ट्रॉफी क्रिकेट स्पर्धेची अंतिम लढत रंगणार आहे.

वडगाव बुद्रुक येथील सिंहगड रोडवरील मैदानावर ही स्पर्धा सुरू आहे. पहिल्या उपांत्य लढतीत प्रशांत शुक्लाच्या अष्टपैलू कामगिरीच्या जोरावर अदिश्री संघाने अलोक इलेव्हन संघावर ३८ धावांनी मात केली. अदिश्री संघाने प्रथम फलंदाजी करताना निर्धारित ८ षटकांत ५ बाद १००



धावांपर्यंत मजल मारली. प्रशांतने सहा चेंडूंत तीन षटकारांसह १९ धावा फटकारल्या. यानंतर लक्ष्याचा पाठलाग करताना अलोक इलेव्हनचा डाव ७.२ षटकांत ६२ धावांत संपुष्टात आला. प्रशांतने दोन षटकांत केवळ नऊ धावा देऊन चौघांना बाद केले.


यानंतर दुसऱ्या उपांत्य लढतीत अनिकेत ताकवणेच्या फटकेबाजीच्या जोरावर हमराज मृत्युंजय संघाने बारामती ब्लास्टर्स संघाचे आव्हान सात गडी राखून परतवून लावले. बारामती संघाने प्रथम फलंदाजी करताना निर्धारित ८ षटकांत ९ बाद ७५ धावा केल्या. यानंतर हमराज संघाने विजयी लक्ष्य तीन गडींच्या मोबदल्यात ७.१ षटकांतच पूर्ण केले.

## एकदिवसीय क्रिकेट स्पर्धेत विराग क्रिकेट अकादमी संघाचा दुसरा विजय

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** लायन्स क्लब पुणे रहाटणी च्या वतीने आयोजित लायन्स ज्युनियर लीग १३ वर्षाखालील एकदिवसीय क्रिकेट स्पर्धेत साखळी फेरीत विराट सुरतकर ३-९) याने केलेल्या सुरेख गोलंदाजीसह श्रीनिधी कदम(७८धावा), विहान परब(५२धावा)यांनी केलेल्या अर्धशतकी खेळीच्या जोरावर विराग क्रिकेट अकादमी संघाने व्हिजे स्पोर्टस क्लब संघाचा १७२ धावांनी पराभव करून दुसरा विजय मिळवला.

फोर स्टार मैदान हिंजवडी येथे सुरू असलेल्या या स्पर्धेत साखळी फेरीत पहिल्यांदा खेळताना विराग क्रिकेट अकादमी संघाने ४७.१ षटकात १ बाद ३०२ धावा केल्या. यात श्रीनिधी कदमने ६० चेंडूत १६ चौकार व 1षटकारासह ७८ धावा,



विहान परबने ४६ चेंडूत ७ चौकार व १ षटकारासह ५२ धावा, अभिनव पाटील ३५, प्रिन्स कलाटे २३ यांनी धावा काढून संघाच्या डावाला आकार दिला.

याच्या उत्तरात व्हिजे स्पोर्टस क्लब संघ २६ षटकात सर्वबाद १३० धावावर कोसळला. यात सिद्धेश नाईक नाबाद १८, क्रिशय बांडे १६, कर्तव्य राठोड १६ यांनी थोडासा प्रतिकार केला. विराग क्रिकेट अकादमी संघाकडून विराट सुरतकर(३-९), विहान सुतार(२-५), शाश्वत सिंग(२-१०), रुद्र भगत(१-१)यांनी उत्कृष्ट गोलंदाजी करत संघाला १७२ धावांनी विजय मिळवून दिला..

### डॉ.प्रमोद मुळे स्मृती करंडक प्रौढ राज्यमानांकन टेबल टेनिस स्पर्धेत

## सारिका, मुनमुन, रंजना, पर्सी यांना विजेतेपद

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पीवायसी हिंदू जिमखाना क्लब आयोजित डॉ.प्रमोद मुळे स्मृती करंडक प्रौढ राज्यमानांकन टेबल टेनिस स्पर्धेत पुण्याच्या सारिका वरदे व रंजना पत्की, मुंबई उपनगरच्या मुनमुन मुखर्जी, मुंबई शहरच्या पर्सी मेहता यांनी आपापल्या गटातील प्रतिस्पर्धी खेळाडूंचा पराभव करून विजेतेपद संपादन केले.

पुणे जिल्हा टेबल टेनिस संघटनेच्या मान्यतेने पीवायसी क्लबच्या कम्युनिटी हॉलमध्ये



सुरू असलेल्या या स्पर्धेत ३९ वर्षांवरील महिला गटात अंतिम लढतीत पुण्याच्या अव्वल मानांकित सारिका वरदे हीने आपल्या लौकिकाला साजेशी खेळी करत यवतमाळच्या स्नेहल भोळेचा ११-६, ११-३, ११-३ असा पराभव करून विजेतेपद पटकावले. ४९ वर्षांवरील महिला गटात अंतिम फेरीत मुंबई उपनगरच्या चौथ्या मानांकित मुनमुन मुखर्जीने ठाण्याच्या तिसऱ्या मानांकित सुष्मा मोगरेचा ११-८, ११-५, ४-११, ६-११, ११-७ असा संघर्षपूर्ण पराभव करून विजेतेपद पटकावले.

६४ वर्षांवरील महिला गटात अंतिम फेरीच्या सामन्यात पुण्याच्या बिगर मानांकित रंजना पत्कीने मुंबई शहरच्या अव्वल मानांकित सुनंदा राववर ११-४, ९-११, ११-५, ११-७ असा सनसनाटी विजय मिळवत विजेतेपदाचा मान पटकावला. ६९ वर्षांवरील पुरूष गटात अंतिम फेरीत मुंबई शहरच्या तिसऱ्या मानांकित पर्सी मेहताने मुंबई उपनगरच्या चौथ्या मानांकित जितू मावनानीचा ९-११, ११-१३, १३-११, 11-७, ११-० असा पराभव करून विजेतेपदाला गवसणी घातली.

स्पर्धेतील विजेत्यांना करंडक व रोख रकमेची पारितोषिके देण्यात आली.